सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २८३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १५ डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## महापालिका निवडणुकांचा बिगुल वाजला

### अमरावती सह २९ मनपांसाठी १५ जानेवारीला मतदान, १६ जानेवारीला मतमोजणी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंबई**

राज्याच्या राजकारणातील सर्वात चर्चेचा विषय ठरलेल्या महापालिका निवडणुकांची आज घोषणा करण्यात आली. राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका एकाच टप्प्यात घेतल्या जाणार असल्याचे निवडणूक आयोगाने सांगितले. १५ जानेवारीला मतदान तर १६ जानेवारीला मतमोजणी होणार अशी घोषणा राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केली. नामनिर्देशन पत्र ऑफलाईन घेण्यात येईल. राजकीय पक्षांच्या विनंतीनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

गेल्या २-३ वर्षापासून या महापालिकांच्या निवडणुका रखडल्या होत्या. मात्र अखेर आज निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. आगामी महापालिका निवडणुकांबद्दल आज कार्यक्रम जाहीर झाला. राज्यातील सर्व २९ महापालिकांची निवडणूक एकाच टप्प्यात होणार, अशी माहिची सूत्रांकडून आधीच मिळाली होती. ५० टक्के आरक्षण मर्यादेचा अडसर नाही असेही सांगण्यात आले होते.दरम्यान, नागपूर आणि चंद्रपूर या दोनच महापालिका अशा आहेत की, जिथे ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेली आहे. त्यामुळे येथे आधी ५० टक्क्यांच्या आत आरक्षण दिले जाईल, अशा पद्धतीने पुनर्रचना करून मगच तेथे निवडणूक घेतली जाईल, असा तर्क आहे. मात्र, आयोगाच्या सूत्रांनी त्याचा इन्कार केला. ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली आहे, अशा ठिकाणी निवडणूक घेऊ नये, असे न्यायालयाने निकालात कुठेही म्हटलेले नाही. त्यामुळे हा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

आयोगाच्या माहितीनुसार, मुंबईसह २९ महापालिकांतील २८६९ जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. यात १४४२ महिला उमेदवार आहेत. त्यात अनुसूचित जातीच्या ३४१, एसटीच्या ७७ व नागरिकांचा मागास प्रवर्गातील ७५९ महिला उमेदवारांचा समावेश आहे.

या निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ ची मतदार यादी वापरण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. मतदार यादीत दुबार नावे असणाऱ्या मतदारांच्या नावापुढे डबल स्टार चिन्ह असेल. या मतदारांना कोणत्याही एका मतदान केंद्रावर मतदान करता येईल. संभाव्य दुबार मतदारांच्या घरी जाऊन पाहणी केली जाईल. मुंबईत १०, १११ मतदान केंद्र असतील, असे ते म्हणाले.

### २९ महापालिकांमधील एकूण जागा - २८६९

महिला - १४४२
अनु. जाती - ३४१
अनु. जमाती - ७७
मागास प्रवर्ग - ७६९

### महापालिका निवडणुकीत खर्चाची मर्यादा किती?

अ वर्ग - १५ लाख
ब वर्ग - १३ लाख
क वर्ग - ११ लाख
ड वर्ग - ९ लाख

### या महापालिकेत होणार निवडणूक

१) अहिल्यानगर महानगरपालिका
२) अकोला महानगरपालिका
३) अमरावती महानगरपालिका
४) भिवंडी निजामपूर महानगरपालिका
५) बृहन्मुंबई महानगरपालिका
६) चंद्रपूर महानगरपालिका
७) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
८) धुळे महानगरपालिका
९) इचलकरंजी महानगरपालिका
१०) जळगाव महानगरपालिका
११) जालना महानगरपालिका
१२) कल्याण- डोंबिवली महानगरपालिका
१३) कोल्हापूर महानगरपालिका
१४) लातूर महानगरपालिका
१५) मालेगाव महानगरपालिका
१६) मीरा- भाईंदर महानगरपालिका
१७) नागपूर महानगरपालिका
१८) नांदेड वाघाळा महानगरपालिका
१९) नाशिक महानगरपालिका
२०) नवी मुंबई महानगरपालिका
२१) पनवेल महानगरपालिका
२२) परभणी महानगरपालिका
२३) पिंपरी- चिंचवड महानगरपालिका
२४) पुणे महानगरपालिका
२५) सांगली- मिरज कुपवाड महानगरपालिका
२६) सोलापूर महानगरपालिका
२७) ठाणे महानगरपालिका
२८) उल्हासनगर महानगरपालिका
२९) वसई विरार महानगरपालिका

### 'असा' असेल निवडणुकीचा कार्यक्रम

उमेदवारी दाखल २३ ते ३० डिसेंबर
उमेदवार अर्जांची छाननी ३१ डिसेंबर
उमेदवारी मागे घेण्याची मुदत २ जानेवारी २०२६
निवडणूक चिन्ह वाटप व अंतिम उमेदवार यादी ३ जानेवारी २०२६
मतदान १५ जानेवारी २०२६
मतमोजणी १६ जानेवारी २०२६

## मोदी तेरी कब्र खुदेगी, काँग्रेसच्या घोषणाबाजीवर भाजपाचा संताप; लोकसभा-राज्यसभेत खडाजंगी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नवी दिल्ली**




संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान सत्ताधारी आणि विरोधक अनेक मुद्द्यांवर आमने-सामने आल्याचं पाहायला मिळालं. यंदाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, राहुल गांधी, अमित शाह, प्रियांका गांधी, सुप्रिया सुळे अशा नेतेमंडळींच्या भाषणांमुळे निवडणूक आयोगाच्या कारभारावर आक्रमक चर्चा पाहायला मिळाली. आता दुसऱ्या आठवड्याची सुरुवातदेखील दोन्ही बाजूच्या नेत्यांची आक्रमक भूमिका आणि शून्य प्रहरात सभागृह तहकूब करण्याची वेळ या घडामोडींनी झाली. आणि याला कारणीभूत ठरली काँग्रेसच्या एका सभेतली घोषणाबाजी!

लोकसभेत संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी आज लोकसभेचं कामकाज सुरू होताच काँग्रेसच्या एका सभेतील घोषणाबाजीचा मुद्दा उपस्थित केला. या सभेत सदर घोषणाबाजीवेळी काँग्रेसचे सर्व शीर्षस्थ नेते उपस्थित होते, असा दावादेखील किरेन रिजिजू यांनी केला.

आम्ही एकमेकांचे विरोधी आहोत, शत्रू नाही. २०१४ मध्ये जेव्हा भाजपाच्या एका खासदाराने विरोधकांबबाच चुकीचा शब्द वापरला होता. पंतप्रधानांनी तातडीने आपल्या खासदाराला माफी मागायला सांगितलं आणि त्या खासदारांनीदेखील माफी मागितली. पण काल काँग्रेसच्या सभेत पंतप्रधान मोदींची कबर खोदण्याची भाषा बोलली गेली. ही या देशासाठी दु:खाची बाब आहे की काँग्रेस पक्ष अशा शब्दांचा वापर करत आहे, असं किरेन रिजिजू म्हणाले.पक्षाचे सर्व वरीष्ठ नेते त्या सभेला उपस्थित होते. या देशासाठी यापेक्षा लाजिरवाणी, यापेक्षा दुर्दैवी कुठली गोष्ट असू शकत नाही. देशाच्या १४० कोटी जनतेचे नेते पंतप्रधान नरेंद्र मोदींची कबर खोदण्याचा उल्लेख काँग्रेसच्या सभेत केला गेला. माझी मागणी आहे की काँग्रेसच्या शीर्षस्थ नेत्यांनी या प्रकाराबद्दल लोकसभेच्या सदनाच्या माध्यमातून देशाची माफी मागायला हवी, अशी मागणी किरेन रिजिजू यांनी यावेळी केली.

**काँग्रेसच्या कोणत्या सभेत 'मोदी तेरी कब्र खुदेगी'च्या घोषणा?**

रविवारी दिल्लीच्या रामलीला मैदानावर काँग्रेसची जाहीर सभा झाली. या सभेला लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह काँग्रेसचे अनेक वरीष्ठ नेते उपस्थित होते. या सभेला येणाऱ्या कार्यकर्त्यांनी मोदी तेरी कब्र खुदेगी, आज नहीं तो कल खुदेगी, वोट चोर, गद्दी छोड अशा प्रकारच्या घोषणा दिल्याचा दावा केला जात आहे. यासंदर्भातले काही व्हिडीओदेखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. या व्हिडीओमध्ये काही महिला कार्यकर्त्या या घोषणा देताना दिसत आहेत.

## भारत-पाकिस्तान यांच्यात दोन महिन्यात युद्ध प्रकाश आंबेडकर यांची मोठी भविष्यवाणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंउल्हासनगर**



पाकिस्तानला अमेरिकेसह चीन, इंग्लंड, रशिया शस्त्रसाठा पूरवित असल्याने, येत्या दोन महिन्यात पाकिस्तान व भारत युद्ध होण्याचे भाकीत वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी उल्हासनगर येथील सभेत वर्तवले आहे. हे युद्ध देशातील जनतेवर नसून, मोदीच्या ध्येय धोरणावर असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

उल्हासनगर महापालिका निवडणूकीच्या पाश्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्या सभेचे आयोजन सुभाष टेकडी येथील मैदानात आयोजण केले होते. मैदानात उच्चांकी सभा झाली. आंबेडकर यांनी मोदी यांच्यावर चौफर टिका केली. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत मत चोरी झाली असून रात्री ६ नंतर ४६ लाख मतदान झाले. याबाबत एकत्रित आवाज उठविण्याचा सल्ला विरोधी पक्षांच्या नेत्यांना दिला. मात्र मोदीच्या पोस्टर्सला भिणाऱ्यां नेत्यांनी आवाज उठवून न्यायालयाचे दार ठोठावले नाही. आम्ही निवडणूक आयोगाला याबाबत नियमावली मतदान रेकॉर्डची प्रत मागितली. मात्र आज पर्यंत आयोगाने रेकॉर्ड दिले नाही.

रशियाचे अध्यक्ष पुतीन भारतात आले. त्यांनी भारताला काय दिले व भारताने रशियाला काय दिले? असा प्रश्न आंबेडकर यांनी मोदीना केला. जागतिकस्तरावर भारत एकाएकी पडला असून पाकिस्तनला अमेरिका, चीन, रशिया व इंग्लंड शस्त्रसाठा पूरवित आहे. याचा परिणाम पाकिस्तान येत्या दोन महिन्यात भारता सोबत युद्ध करणार आहे. असे भाकीत आंबेडकर यांनी केले. हे युद्ध देशातील जनते विरोधात नसून मोदी विरोधात असेल असेही म्हणाले. मोदी यांची माजोरी उतरविण्यासाठी पाकिस्तानाला शस्त्रसाठा देऊन, भारताचा काटा काढण्याचे काम काही देश करीत आहेत. मागच्या १० दिवसापूर्वी एका चव्हाण नावाच्या आर्मीने युद्धाला तोंड फुटणार असल्याचे वक्तव्य केले. असे आंबेडकर म्हणाले.

## महाराष्ट्रात राज - उद्धव यांची युती

### पुण्यात शिवसेना ठाकरे गट - मनसेची जागा वाटपावर चर्चा सुरू होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंबई**

पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी उद्धवसेना आणि मनसेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची आज चाय पे चर्चा झाली. उद्धवसेनाच्या कार्यालयात ही बैठक झाली. या दोन्ही पक्षांमध्ये कुठल्या प्रभागात कोणाचे पारडे जड आहे, याचा विचार करून दोन्ही पक्षांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये जागावाटपावर चर्चा होणार आहे.



महापालिका निवडणुकीसाठी उद्धवसेनेचे प्रमुख, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांची युती होणार आहे. त्या दृष्टिकोनातून पुणे महापालिका निवडणुकीसाठी दोन्ही पक्षांची पावले पडू लागली आहेत. या दोन्ही पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यालयात बैठक झाली. यावेळी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, अशोक हरणावळ, वसंत मोरे, प्रशांत बधे तर मनसेचे शहरप्रमुख साईनाथ बाबर, बाबू वागस्कर, बाळा शेडगे, आदी उपस्थित होते. यावेळी पालिका निवडणुकीबाबत अनौपचारिक चर्चा झाली.शिवसेनेच्या ठाकरे गटाचे पदाधिकारी सोमवारी मनसेच्या कार्यालयात जाणार आहेत. त्यानंतर येत्या बुधवारपासून या दोन्ही पक्षांमध्ये कुठल्या प्रभागात कोणाचे पारडे जड आहे, याचा विचार करून दोन्ही पक्षांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये जागावाटपावर चर्चा होणार आहे.

## 'मनरेगा' बंद! मोदी सरकार आणणार 'विकसित भारत-जी राम जी' योजना

### राज्यांवर पडणार अतिरिक्त भार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नवी दिल्ली**




केंद्रातील मोदी सरकारने ग्रामीण भागातील रोजगार हमी योजनेत मोठा आणि ऐतिहासिक बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. युपीए सरकारच्या काळात २००५ मध्ये सुरू झालेली महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना मनरेगा आता इतिहासजमा होणार आहे. तिचे नाव बदलून केंद्र सरकार 'विकसित भारत-जी राम जी रोजगार आणि आजीविका अभियान (ग्रामीण) २०२५' ही नवी योजना आणली जाणार आहे.

ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी लोकसभेत या बदलाबाबत माहिती दिली. ते म्हणाले, मनरेगामुळे गेली २० वर्षे ग्रामीण कुटुंबांना रोजगाराची हमी मिळाली असली तरी, ग्रामीण भागातील सामाजिक-आर्थिक परिस्थिती बदलली आहे. त्यामुळे, मनरेगाच्या मूळ उद्दिष्टाला बळकट करून आता या योजनेला 'विकसित भारत २०४७' या राष्ट्रीय व्हिजनशी जोडणे आवश्यक झाले आहे. नवीन योजनेत केवळ रोजगार हमी न देता, सक्षमीकरण, विकास आणि सरकारी योजनांचा परिपूर्ण लाभ देण्यावर भर असेल, जेणेकरून एक समृद्ध ग्रामीण भारत उभा राहील. या योजनेद्वारे विकसित भारत नॅशनल रूरल इन्फ्रास्ट्रक्चर स्टॅक यार केला जाईल.

**काय आहे नवीन कायद्यात?**

मनरेगा कायद्यानुसार ग्रामीण कुटुंबांना वर्षातून १०० दिवसांच्या वेतनासह रोजगाराची कायदेशीर हमी मिळते. मात्र, नवीन 'VBAG RAM G' विधेयकात ही रोजगार हमी १०० दिवसांवरून वाढवून १२५ दिवसांची करण्याचा प्रस्ताव आहे. मनरेगा ऐवजी 'VBAG RAM G' हे नाव असणार आहे. सध्या मनरेगाच्या निधीत केंद्र आणि राज्यांचा सहभाग असतो. नव्या कायद्यात राज्यांवर या योजनेसाठी अधिक खर्च करण्याची जबाबदारी असेल, ज्यामुळे ग्रामीण भागातील कामांचा विस्तार आणि गुणवत्ता वाढेल.

**काँग्रेसचा आक्षेप**

या बदलावर काँग्रेसने तीव्र आक्षेप घेतला आहे. काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी मनरेगा योजनेतून महात्मा गांधींचे नाव का काढले जात आहे, असा थेट सवाल उपस्थित करत सरकारच्या या निर्णयावर टीका केली आहे.

## पंतप्रधान मोदींमुळेच CBSE च्या पुस्तकात छत्रपतींचा २१ पानांचा जाज्वल्य इतिहास - देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५पुणे**

आपला देश स्वतंत्र झाल्यानंतर उइडए च्या इतिहासाच्या पुस्तकात शिवाजी महाराजांबद्दल फक्त एका पॅरेग्राफमध्ये इतिहास सांगितला जायचा, तर मुघलांच्या इतिहासाला १७ पाने दिली होती. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा इतिहास बदलला. आता मुघलांचा इतिहास कमी करण्यात आला असून, छत्रपतींचा २१ पानांचा जाज्वल्य इतिहास पिढ्यांना शिकवण्यासाठी पुस्तकात दिला गेला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. पुण्यातील कात्रज कोंढवा रस्त्यावर इस्कॉन चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याचे लोकार्पण फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.



फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांना महाराजांना हिंदवी स्वराज्य निर्माते म्हणून गौरवले. ज्यांनी स्वाभिमान शिकवला आणि ज्यांच्यामुळे आज भगवा जिवंत आहे. कोंढव्यात शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्याची संधी मला मिळाली. योगेश टिळेकर यांच्या आग्रहामुळे हा भव्य पुतळा कोंढव्याच्या भूमीवर उभा राहिला. या पुतळ्यामुळे केवळ कोंढवा बुद्रुक परिसराचे नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचे वैभव वाढले आहे. महाराजांच्या पुतळ्याचे उद्घाटन करणे ही माझ्या मागच्या जन्मीची पुण्याई समजतो असल्याचे ते म्हणाले.

## पुण्यातील खासगी क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांमध्ये गँगवॉर

### विद्यार्थ्याचा गळा चिरून खून, शिक्षक वर्गात शिकवत असतानाच घडला थरार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५पुणे**




विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे जिल्ह्याला हादरवून सोडणारी अत्यंत धक्कादायक घटना खेड तालुक्यातील राजगुरूनगर येथे घडली आहे. येथील एका खासगी कोचिंग क्लासमध्ये शिक्षक शिकवत असतानाच एका विद्यार्थ्याने आपल्याच सहअध्यायी मित्राचा गळा चिरून निर्घृण खून केला आहे. दहावीच्या वर्गात घडलेल्या या खुनाच्या घटनेने संपूर्ण शहर सुन्न झाले असून, विद्यार्थ्यांमधील गँगवॉरमधून हा प्रकार घडल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राजगुरूनगर शहरात आज भल्या पहाटे दहावीच्या विद्यार्थ्यांचा खासगी क्लास सुरू होता. वर्गात शिक्षक शिकवत असताना अचानक विद्यार्थ्यांच्या दोन गटांत वाद उफाळून आला. याच वेळी एका विद्यार्थ्याने रागाच्या भरात आपल्या बॅगेतून धारदार चाकू काढला आणि बेंचवर बसलेल्या मित्रावर सपासप वार करण्यास सुरुवात केली.

**वर्गाबाहेर गाठून चिरला गळा**

अचानक झालेल्या हल्ल्यामुळे वर्गात एकच खळबळ उडाली. जिवाच्या आकांताने पीडित विद्यार्थी बचावासाठी वर्गाबाहेर पळाला. मात्र, हल्लेखोर विद्यार्थ्याने त्याचा पाठलाग सोडला नाही. त्याने क्लासच्या बाहेरच त्याला गाठले आणि त्याचा गळा चिरला. या हल्ल्यानंतर संबंधित विद्यार्थी रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर कोसळला.

**हल्लेखोर दुचाकीवरून पसार**

हा भयानक प्रकार घडवून आणल्यानंतर आरोपी विद्यार्थी घटनास्थळावरून आपल्या दुचाकीवरून फरार झाला. दरम्यान, उपस्थित नागरिक आणि क्लासचालकांनी जखमी विद्यार्थ्याला रक्ताच्या थारोळ्यातून उचलून तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, अतिरक्तस्राव झाल्याने उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. पुष्कर दिलीप शिंगाडे असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे.

**पालक धास्तावले; आरोपींना अटक**

या घटनेची माहिती मिळताच खेड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून पंचनामा केला आहे. हत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट नसले तरी, हे प्रकरण विद्यार्थ्यांमधील आपसी वाद किंवा गँगवॉरचे असावे, असा संशय व्यक्त केला जात आहे. हल्ला करणारा विद्यार्थी आणि त्याच्या साथीदाराने स्वतः पोलिस ठाण्यात हजर होऊन गुन्ह्याची कबुली दिली. दोन्ही अल्पवयीन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

## संपादकीय ......

# तिकीट दलालांना 'तत्काळ' दणका

*आता रेल्वेचे तत्काळ तिकिट काऊंटरवर काढायचे असेल, तर मोबाईलवरचा ओटीपी महत्त्वाचा ठरणार आहे. यामुळे तत्काळ तिकिटाचा होणारा काळाबाजार रोखला जाईल.भारतीय रेल्वेने तत्काळ श्रेणीतील तिकिटाच्या बुकिंग व्यवस्थेत मोठा बदल केला आहे. आता काऊंटरवर तत्काळ तिकीट काढायचे असेल, तर मोबाईलवरचा ओटीपी महत्त्वाचा आहे. या ओटीपीद्वारे प्रवाशाची पडताळणी केली जाणार आहे. ओटीपी नमूद केल्यानंतरच तिकीट निश्चित होईल. रेल्वेच्या मते ओटीपीचे बंधन घातल्याने तत्काळ श्रेणीतील तिकिटाचा होणारा काळाबाजार रोखला जाईल, शिवाय पारदर्शकता वाढेल आणि गरजू प्रवाशांना त्याचा लाभ मिळेल. नवीन प्रणाली प्रायोगिक पातळीवर राबविण्यात आली आणि ती यशस्वीही ठरली आहे.*

*रेल्वेच्या मते, गेल्या काही वर्षांत तत्काळ तिकिटाचा काळाबाजार वाढला होता. तसेच बनावट बुकिंगच्या तक्रारीदेखील वाढल्या आहेत. अनेक एजंट एकाचवेळी अनेक तिकीटे काढण्यासाठी बनावट नंबर आणि ओळखपत्राचा आधार घेतात. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना तत्काळ श्रेणीतील तिकीट मिळणे कठीण जाते. आता ओटीपीतून पडताळणी होत असल्याने प्रत्येक तिकीट बुक करण्यासाठी प्रवासी स्वत: हजर असणे आणि मोबाईल नंबरची पडताळणी अनिवार्य झाली आहे. अर्थात, ही व्यवस्था ऑनलाईन तिकिटाच्या आरक्षणात लागू केलेली आहे आणि त्यात आता तत्काळ श्रेणीची भर पडली आहे.*

*रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या बदलाला मान्यता देताना रेल्वेची आरक्षण व्यवस्था आणि तिकीट प्रणाली संपूर्णपणे पारदर्शक, सुरक्षित आणि प्रवासीपूरक करण्याचा यामागचा उद्देश असल्याचे म्हटले आहे. जुलै २०२५ मध्ये ऑनलाईन तत्काळ तिकिटासाठी आधार आधारित ऑथेंटिकेशन लागू करण्यात आले आणि त्यामुळे बनावट आयडीचा वापर बर्यापैकी कमी झाला. त्यानंतर ऑक्टोबर २०२५ मध्ये जनरल रिझर्व्हेशन सिस्टीममध्ये ओटीपी व्हेरिफिकेशनला जोडले. त्यात प्रवाशांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला. या श्रेणीत आता काऊंटर बुकिंगमध्येदेखील ओटीपीचे बंधन घातले जात आहे.*

*रेल्वेकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी त्याची प्रायोगिक चाचणी घेण्यात आली. त्यानुसार देशभरातील ५२ रेल्वेगाड्यांत ओटीपी आधारित तत्काळ तिकीट प्रणाली लागू केली. या चाचणीचे परिणाम सकारात्मक आले. रेल्वे कर्मचार्याच्या मते, प्रायोगिक चाचणीच्या वेळी बनावट बुकिंगच्या प्रमाणात सुमारे ४० टक्के घट झाली आणि गरजू प्रवाशांना तिकीट मिळण्याच्या प्रमाणात वाढ झाली. प्रवाशांनीदेखील यासंदर्भातील अनुभव शेअर केला. त्यांच्या मते, ओटीपी प्रक्रिया खूपच सुलभ असून या प्रक्रियेत तिकीट निश्चिती लगेचच होते. यानंतर रेल्वे मंडळाने ही व्यवस्था देशभरातील सर्व रेल्वेंना लागू करण्याची तयारी केली आहे. ही व्यवस्था टप्प्याटप्प्याने सर्व स्थानकांवर लागू करण्यात येईल.*

*नव्या व्यवस्थेनुसार, एखादा प्रवासी तत्काळ तिकिटासाठी काऊंटरवर दाखल होईल तेव्हा तिकीट विक्री करणारा कर्मचारी प्रवाशाचा मोबाईल क्रमांक घेईल. त्यानंतर प्रवाशाच्या मोबाईल नंबरवर सहा अंकी ओटीपी क्रमांक पाठवेल. ओटीपीची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर तिकीट जारी केले जाईल. प्रवाशाने चुकीचा मोबाईल क्रमांक दिल्यास किंवा ओटीपी येत नसेल, तर तिकीट दिले जाणार नाही. रेल्वेच्या मते, यामुळे केवळ बनावट आरक्षण बंद होणार नाही, तर दलाल, एजंट आणि तिकिटाचा काळाबाजार करणार्यांविरोधात ही व्यवस्था निर्णायक पाऊल ठरेल.*

*रेल्वे लवकरच आयआरसीटीसी ॲपमध्येदेखील सुधारणा करण्यासाठी प्रयत्नशील आहे. यात फेस रिकग्निशन, बायोमेट्रिक व्हेरिफिकेशन आणि तातडीने पेमेंट प्रक्रिया यासारखे पर्यायदेखील जोडले जाण्याची शक्यता आहे. हे सर्व फिचर्स तिकीट सिस्टीमला डिजिटल आणि पारदर्शक करण्याच्या रेल्वेच्या उद्देशाला अनुसरून आहेत. रेल्वेच्या सूत्राने दिलेल्या माहितीनुसार, ओटीपी आणि आधारआधारित ऑथेंटिकेशनच्या कारणांमुळे तिकीट बुकिंगचा संपूर्ण डेटा अधिक सुरक्षित होईल आणि दलालांवर लक्ष ठेवणे सोयीचे जाईल. एखादा व्यक्ती सतत तिकीट बुक करत असेल, तर सिस्टीमकडून त्याच्या हालचालीला रोखले जाईल. त्यामुळे दलाल आणि काळाबाजार करणार्या एजंटवर अंकुश बसविण्यास मदत मिळेल.*

*रेल्वेच्या दाव्यानुसार या बदलामुळे गरजू प्रवाशांना लाभ मिळेल. कारण, या व्यवस्थेत तिकीट खरेदीत पारदर्शकता राहणार असून बुकिंगमध्ये कोणतीही फसवाफसवी नसेल. प्रवाशांनी मोबाईल क्रमांक अपडेट ठेवण्याचे आवाहन रेल्वे मंत्रालयाने केले आहे. तसेच तिकीट बुकिंगच्या काळात मोबाईल जवळ बाळगण्याचाही सल्ला दिला आहे. मोबाईल क्रमांक चुकीचा किंवा जुना असेल, तर ओटीपी मिळणार नाही. परिणामी, तिकीट मिळणार नाही. तसेच ज्येष्ठ किंवा विशेष प्रवाशांसाठी रेल्वे कर्मचार्यांकडून मदत केली जाईल. कोणताही गरजू प्रवासी तिकिटापासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली जाईल. या सुधारणांमुळे रेल्वेने या वर्षाच्या अखेरीस संपूर्ण देशात तिकिटिंग सिस्टीमचे डिजिटायजेशन करण्याचे ध्येय ठेवले आहे. ओटीपीआधारित तत्काळ तिकीट प्रणाली आणि आठ तास अगोदर चार्ट तयार करणे यासारख्या सुधारणा महत्त्वाच्या आहेत. या बदलामुळे तत्काळ तिकीट मिळण्यात होणारी गैरसोय दूर होईल, अशी प्रवाशांना अपेक्षा आहे. आगामी महिन्यात प्रवाशांची मते जाणून घेऊन सुविधेत आणखी सुधारणा केली जाणार आहे. यानुसार रेल्वेचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुखकर करण्याचा प्रयत्न केला जाईल.*


*प्रवाशांना सुविधा देण्यासाठी रेल्वेने आरक्षण तक्ता तयार करण्याच्या कालावधीतदेखील बदल केला आहे. आतापर्यंत बहुतांश रेल्वेचा चार्ट त्यांच्या निर्धारित प्रस्थान वेळेच्या चार तास अगोदर जारी केला जात असे. या कारणामुळे प्रतीक्षा यादीत अडकलेले प्रवाशांना शेवटच्या क्षणापर्यंत तिकीट कन्फर्म झाले आहे की नाही, हे कळत नसायचे. प्रवास काही तासांवर आलेला असताना तिकिटाची स्थिती कळत असे आणि अशावेळी त्यांची प्रवासाची योजना बारगळत असे. त्यामुळे रेल्वेने आता चार्ट जारी करण्याची वेळ चार तासांवरून आठ तासांवर नेली आहे. त्यामुळे प्रतीक्षा यादीत असलेल्या प्रवाशांना तिकिटाची शेवटची स्थिती समजल्यानंतर प्रवासात बदल करण्यास पुरेसा वेळ मिळेल. एखाद्याचे तिकीट कन्फर्म झाले नाही, तर तो अन्य रेल्वेचे तिकीट काढू शकेल किंवा बस किंवा विमानातून प्रवास करू शकेल. रेल्वे अधिकार्याच्या मते, हा बदल प्रवाशांच्या सुविधा लक्षात घेता करण्यात आल्या आहेत. रेल्वे मंत्र्यांच्या मते, चार्टच्या वेळेत केलेला बदल हा प्रवाशांना अधिक वेळ मिळण्यासाठी आणि प्रवासाची पुढील योजना आखण्यासाठी पुरेसा वेळ मिळण्याच्या दृष्टीने फायद्याचा ठरू शकतो.*

# राज्यात शेतकरी कर्जमाफीची घोषणा एक जुलैपर्यंत करणार- मुख्यमंत्री

## हिवाळी अधिवेशन; अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेत फडणवीस यांची ग्वाही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५नागपूर-** राज्य सरकारने कर्जमाफीचे वचन दिले आहे. त्याची पूर्तता करण्यासंदर्भात एक समिती तयार केली आहे. कर्जमाफीचा लाभ फक्त शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे यावर भर देण्यात येईल. १ जुलैपर्यंत कर्जमाफीच्या योजनेसंदर्भातील घोषणा करू. सिंचनाचा अनुशेष १३ लाख ८३ हजार हेक्टरचा होता. त्यापैकी १३ लाख ३४ हजार हेक्टरचा सिंचनाचा अनुशेष पूर्ण करण्यात आला. आता फक्त अकोला, बुलडाणा व हिंगोली या जिल्ह्यातील ४९ हजार हेक्टरचा सिंचनाचा अनुशेष बाकी आहे.



सिंचनाच्या योजना पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्रात दुष्काळ हा भूतकाळ होईल.

२०३५ चा अमृतमहोत्सवी महाराष्ट्र घडवण्याचे प्रयत्न आहे. एकत्रितपणे महाराष्ट्राला पुढे नेण्याकरिता प्रयत्न करू. मुंबई कालही महाराष्ट्राची होती, आजही आहे आणि चंद्र, सूर्य असेपर्यत मुंबई महाराष्ट्राचीच राहील. सीबीएसईच्या पुस्तकात यापूर्वी मराठा साम्राज्य एक पानाचा आणि मुघलांचा इतिहास १७ पानांचा होता. आता मराठा साम्राज्याचा इतिहास २१ पानांचा आहे.

लाडकी बहीण, शेतकऱ्यांना मोफत वीज आदी सर्व योजना संपूर्ण पाच वर्षे सुरू राहतील. व्हिजन डॉक्युमेंट तयार केले आहे. २०४७ चा विकसित महाराष्ट्राचा रोडमॅप तयार केला आहे. आपल्या तिजोरीत खूप पैसे आहे असे म्हणणार नाही. सर्व निकषांवर पात्र होणारी अर्थव्यवस्था महाराष्ट्राची आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना सांगितले.

### १२ ते १३ हजार मेगावॅट वीजनिर्मिती २०२६ मध्ये मोफत विजेसाठी २६ हजार ६८१ कोटी खर्च

सीसीआयने उत्पादकतेवर आधारित कापूस खरेदीचा निर्णय घेतला होता. केंद्राशी चर्चा करून २३ किलो प्रति हेक्टर उत्पादकतेनुसार कापूस खरेदीचा निर्णय घेतला. शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यासाठी २६ हजार ६८१ कोटी खर्च करीत आहोत. १६ हजार मेगावॅट सौर वीजनिर्मिती करीत आहोत. यासाठी वेगळी सौर वीजनिर्मिती कंपनी स्थापन केली आहे. आतापर्यंत ३ हजार मेगावॅट निर्मिती पूर्ण झाली आहे. १२ ते १३ हजार मेगावॅट वीजनिर्मिती २०२६ मध्ये पूर्ण करू शकू. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळेल. यामुळे महावितरणची १० हजार कोटींची बचत होईल. पी. एम. कुसुम योजनेत देशात ११ लाख ९० हजार सौर पंप लावण्यात आले. त्यापैकी ७ लाख ३८ हजार एकट्या महाराष्ट्रात दिले. आतापर्यत विजेचे दर दरवर्षी ९ टक्क्यांनी वाढत हाते. पुढचे पाच वर्षे दरवर्षी २ टक्क्यांनी कमी होणार आहेत.

### मराठवाड्यावर अन्याय नाही

विदर्भ वैधानिक मंडळाची पुनर्स्थापना करण्याचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवला आहे. त्याचा पाठपुरावा करू. पण, मंडळे नाही म्हणून विदर्भ-मराठवाड्यावर अन्याय होऊ देणार नाही. मराठवाड्यातील दुष्काळी भागाचे चित्र बदलेल. १८ तासांचा प्रवास आठ तासांवर येणार आहे. सर्वात मोठी हवाई प्रशिक्षण संस्था अमरावतीत होत आहे. ३४ विमाने आणत आहेत. २ विमाने पोहोचली आहेत. अमरावतीच्या अर्थ व्यवस्थेला कलाटणी मिळेल. अकोला धावपट्टी वाढवण्यासाठी पैसे दिले आहेत, असेही त्यांनी सांगितले.

# लसूण आरोग्यदायी; पण...

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक**



लसणाचा खरा प्रभाव मात्र त्याच्या वापराच्या पद्धतीवर अवलंबून असतो. तो कसा कापला जातो, किती वेळ ठेवला जातो, कसा शिजवला किंवा साठवला जातो, यानुसार त्याचे गुणधर्म बदलतात.कच्चा लसूण हा प्रतिकारशक्तीसाठी सर्वात प्रभावी मानला जातो. लसूण ठेचल्यावर त्यातून आलिसिन नावाचा द्रव्य घटक बाहेर पडतो आणि हा घटक प्रतिजैविक, प्रतिदाहक आणि रोगप्रतिकार वाढवणारा असतो. लसूण ठेचून दहा मिनिटे ठेवून मग सेवन केल्यास हा घटक जास्त कार्यक्षम राहतो. लिंबूपाण्यात, चटण्यांत किंवा कोशिंबिरीत तो सहज वापरता येतो आणि संसर्गाशी लढण्यास शरीराला मदत होते.




थोडा परतलेला लसूणही शरीरासाठी उपयुक्त असतो. तूप किंवा सौम्य तेलात हलके परतल्यास लसणातील बहुतेक गंधकद्रव्ये सक्रिय राहतात आणि यामुळे यकृत शुद्धी, सूज कमी करणे आणि रक्तशुद्धी या क्रियांना मदत होते. दाल, भाजी किंवा हलक्या परतवलेल्या पदार्थांत वापरला जाणारा हा प्रकार चव आणि आरोग्य या दोन्ही दृष्टीने उत्तम ठरतो.क्शरश्रींह

फर्मेटेशनद्वारे तयार होणारा परिपक्व लसूण हृदयाचे आरोग्य सुधारण्यासाठी विशेष लाभदायक मानला जातो. या प्रक्रियेत एस-ॲलिल सिस्टीनसारखे प्रतिऑक्सिडंट वाढतात आणि त्यामुळे कोलेस्टेरॉल संतुलन, यकृताचे कार्य आणि हृदयाची क्षमता सुधारते. दिवसातून एक ते दोन पाकळ्या सरळ खाणे किंवा कोशिंबीरीत मिसळून घेणे उपयुक्त राहते. अतिउष्णतेने लसणाची पोषणक्षमता कमी होते. म्हणजे, जास्त वेळ तळणे, अतितापावर परतणे किंवा खूप भाजणे यामुळे आलिसिन नष्ट होतो आणि लसणातील उपयुक्त द्रव्ये कमी कार्यक्षम बनतात. त्यामुळे लसूण वापरताना त्याचे आरोग्यदायी गुण टिकवण्यासाठी मध्यम किंवा नियंत्रित उष्णता अधिक योग्य असते. लसणाचे हे विविध प्रकार शारीरिक गरजेनुसार वेगवेगळे फायदे देतात. योग्य पद्धत निवडल्यास लसूण शरीराच्या प्रतिकारशक्तीपासून हृदयसंरक्षणापर्यंत अनेक कार्यांत सहाय्यक ठरतो.

# वांग्याच्या शेतीत IC-R-IIVR ने शाश्वत IPDM² तंत्रज्ञान विकसित, खर्च ५० टक्क्यांनी कमी होईल!

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक** वांगी उत्पादक शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. - भारतीय भाजीपाला संशोधन संस्था वाराणसी यांनी वांग्यांसाठी एक शाश्वत आणि स्मार्ट (एकात्मिक कीटक आणि रोग व्यवस्थापन) पॅकेज विकसित आणि प्रमाणित केले आहे. जे कीटक आणि रोग नियंत्रण करण्यासाठी सक्षम आहे. शिवाय रासायनिक फवारण्या ५० टक्क्यांपर्यंत कमी करेल. यामुळे शेतकऱ्यांचा खर्च कमी होईल आणि त्यांचे उत्पन्न वाढीस मदत होणार आहे.वांग्यावरील धोकादायक कीड वांग्याचे पीक प्रामुख्याने शेंडे आणि फळे पोखरणारे कीटक, तुडतुडे, पांढरी माशी, मावा आणि थ्रिप्स यांसारख्या कीटकांमुळे प्रभावित होते. जे पानांचे नुकसान करून, फळे खराब करून अधिक नुकसान करतात. या कीटकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी एकात्मिक कीटक व्यवस्थापन पद्धती वापरल्या जातात. ज्यामध्ये फेरोमोन ट्रॅप, कडुनिंब-आधारित कीटकनाशके, ॲग्रोस्टार रॅपिझेन सारखे रासायनिक द्रावण आणि संक्रमित भाग काढून टाकणे यांचा समावेश आहे. वाराणसी, मिर्झापूर आणि भदोही येथे आयपीडीएम तंत्रज्ञानाची यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांना खूप मदत होईल आणि त्यांच्या पिकांचे संरक्षण होईल.




**हे आयपीडीएम तंत्रज्ञान कसे काम करते?**

हे पॅकेज जैविक, लागवडीखालील आणि गरजेनुसार रासायनिक नियंत्रणाचे संतुलित मिश्रण आहे.

**प्रमुख उपाय**

**ट्रायकोडर्माने बियाणे प्रक्रिया - लवकर रोग रोखते.**

रोपे बुडवणे - लागवडीपूर्वी प्रारंभिक कीटक आणि रोग नियंत्रण.

संक्रमित कोंब आणि फळे आठवड्याला काढून टाकणे - बोअररचा प्रसार रोखते.

प्रति हेक्टर २५-३० फेरोमोन सापळे - कोंब आणि फळ बोअरर नियंत्रणासाठी सर्वात प्रभावी पद्धत.

स्मार्ट स्प्रे - फक्त गरज असेल तेव्हाचकीटकांची पातळी आर्थिक दुखापत पातळी (एढङ) पेक्षा जास्त असेल, म्हणजेच ५%. तेव्हाच फवारणी करा.

**बोअररसाठी लक्षित स्प्रे**

पांढरी माशी असल्यासच औषधाचा वापर

अझाडिरॅक्टिनपासून सुरक्षित आणि पर्यावरणपूरक संरक्षण

संक्रमित फळे आणि लहान पानांची झाडे काढून टाकणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांसाठी प्रमुख फायदे

प्रमुख कीटक आणि रोगांचे मजबूत नियंत्रण

२१-२७ वरून अंदाजे १० फवारण्या कमी केल्या

रासायनिक खर्च कमी केला

उत्पादन सुरक्षित, पर्यावरणपूरक आणि शेतकरी-अनुकूल आहे

IC-R-IIVR कडून मिळालेल्या या तंत्रज्ञानाला शाश्वत शेतीच्या दिशेने एक मोठे पाऊल मानले जाते आणि येत्या हंगामात वांगी उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा मोठा फायदा होईल अशी अपेक्षा आहे.

# महावितरणने एका झटक्यात फेडले १२,८०० कोटींचे कर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ मुंबई,** देशातील सर्वात मोठी वीज वितरण कंपनी असलेल्या महावितरणने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या १२,८०० कोटी रुपयांच्या कर्जाची मुदतीपूर्वी एकाच हफ्त्यात नुकतीच परतफेड केली. अन्य वित्तीय संस्थेकडून कमी व्याज दराचे कर्ज उभारून तसेच स्वनिधीतून ही परतफेड केली असून त्यामुळे व्याजाच्या रकमेत मोठी बचत होईल, अशी माहिती अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.




मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्याची सूचना केली असून त्यादृष्टीने कंपनीवरील कर्जाचा बोजा हलका करण्यासाठी यशस्वी पावले टाकण्यात आली.

महावितरणने विविध टप्प्यांवर स्टेट बँकेकडून एकूण १२,८०० कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. त्यासाठी ८.६५ टक्के ते ९.२५ टक्के दराने व्याज द्यावे लागत होते. त्याऐवजी अन्य वित्तीय संस्थेकडून ७,१०० कोटी रुपये कर्ज ८.२५ टक्के इतक्या कमी व्याजदराने उभारून महावितरणने स्टेट बँकेचे ७,१०० कोटी रुपयांचे कर्ज फेडले. त्या खेरीज महावितरणने स्वनिधीतून ५,६३४ कोटी रुपयांचे स्टेट बँकेचे कर्ज फेडले.

महावितरणने स्टेट बँकेचे कर्ज घेताना आपल्या दहा सर्कलमधील महसूल तारण म्हणून ठेवला होता. या सर्कलमध्ये वार्षिक तीस हजार कोटी रुपयांचा महसूल आहे. स्टेट बँकेचे सर्व कर्ज फेडल्यामुळे हा महसूल तारणमुक्त होईल. त्या आधारे कंपनीला ५०,००० कोटी रुपयांपर्यंतचा निधी माफक व्याजदरात कर्जरुपाने उभा करता येईल.

### महावितरणची पत वाढविणारे पाऊल

महावितरणने एकाच हफ्त्यात स्टेट बँकेच्या १२,८०० कोटी रुपयांच्या कर्जाची मुदतपूर्व परतफेड करण्यामुळे कंपनीची वित्तीय बाजारातील पत वाढली आहे. ही घडामोड गुंतवणूकदारांचा विश्वास वाढविणारी आहे. कंपनीसाठी भविष्यात खासगी किंवा सार्वजनिक बाँड उभारायचे झाल्यास त्यासाठीही इतक्या मोठ्या कर्जाची परतफेड करणे उपयुक्त ठरणारे आहे. आगामी काळात महावितरणला शेअर बाजारात सूचिबद्ध करण्याच्या दृष्टीनेही ही कर्जाची परतफेड महत्त्वाची आहे.-

# वैद्यकीय शिक्षणात वाढतोय मुलींचा टक्का!

## २०१९-२० नंतर मुलींच्या प्रवेशाचे प्रमाण पुन्हा वाढले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५मुंबई**

वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी दरवर्षीच तीव्र स्पर्धा असते. राष्ट्रीय पातळीवरील 'नीट' पात्रता परीक्षेसाठी लाखो विद्यार्थी दरवर्षी बसतात. त्यातून निवड होऊन महाविद्यालयात प्रवेशासाठी पात्रता यादीत स्थान मिळणे तसे अवघडच असते. एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या प्रवेशात मुलींनी त्यांचे स्थान भक्कम केल्याचे दहा वर्षातील आकडेवारी तपासली असता दिसून येते. यंदा सीईटी सेलने राज्य कोट्यातील जागांसाठी घेतलेल्या प्रवेशप्रक्रियेत तब्बल ४,०४० विद्यार्थिनींनी प्रवेश घेतले आहेत.



वैद्यकीय शिक्षणात गेल्या दशकात झालेला बदल हा समाज व आरोग्यक्षेत्रासाठी एक मैलाचा दगड ठरला आहे. राज्यात दहा वर्षांपूर्वी एमबीबीएसच्या केवळ ३,३४७ जागा होत्या. गेल्या दहा वर्षात सरकारी आणि खासगी अशी दोन्ही वैद्यकीय महाविद्यालये राज्यात वाढली आहेत. सध्या राज्यात एमबीबीएस अभ्यासक्रमाची सरकारी आणि अनुदानित अशी ४२ महाविद्यालये आहेत, तर खासगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या २५ झाली आहे. त्यातून एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या जागाही मोठ्या प्रमाणात वाढल्या.

यंदा एमबीबीएसच्या ८,५३५ जागा आहेत. एमबीबीएस प्रवेशासाठी चढाओढ असताना मुलींनीही बाजी मारली आहे. राज्यात २०१५-२०१६ आणि २०१६-१७ या वर्षात एमबीबीएसला ५१ टक्क्यांहून अधिक मुलींनी प्रवेश घेतले होते. त्यानंतर मुलींचा टक्का घसरू लागला होता. २०१९-२० या शैक्षणिक वर्षात तर हे प्रमाण ४१ टक्क्यांपर्यंत घसरले होते. मात्र त्यानंतर पुन्हा मुलींचे प्रमाण वाढू लागले आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षात ४७.३ टक्के मुलींनी प्रवेश घेतला आहे.राज्य सरकारने मुलींसाठी शैक्षणिक शुल्क पूर्ण माफ केले आहे. त्याचा परिणाम खासगी महाविद्यालयांत मुलींच्या प्रवेशात वाढ होण्यात झाला आहे. सरकारी कॉलेजमध्ये प्रवेश मिळू न शकलेल्या अनेक विद्यार्थिनी खासगीमध्ये प्रवेश घेत आहेत.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १५ डिसेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# दरीत जाणारे वाहन अडवण्याचा प्रयत्न; धडकेमध्ये चालक ठार

## चालकामुळे चंद्रपुर येथील २२ महिला पर्यटक सुखरुप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५चिखलदरा–** चंद्रपूरवरून २२ महिला चिखलदरा येथे पर्यटनासाठी आल्या होत्या. रविवारी पर्यटक चंद्रपूरला जाण्यासाठी चिखलदऱ्या वरून परतवाड्याच्या दिशेने येत होत्या. त्यावेळी मार्गातील आड नदीजवळ एका महिला प्रवाशाने उलटी केली. त्यावेळी वाहन उभे करून चालक खाली उतरला. यावेळी काही महिलाही वाहनाच्या खाली उतरल्या मात्र काही महिला वाहनातच बसून होत्या. त्याचवेळी वाहन आपोआप समोर यायला लागले व दरीच्या दिशेने जात होते. बाहन दरीत गेल्यास मोठा अनर्थ होईल म्हणून वाहनचालकाने वाहन




अडवण्याचा प्रयत्न केला. मात्र उतारावरून आलेले वाहन चालकाला अडवणे शक्य झाले नाही. याचवेळी वाहनाचा व झाडाचा मार लागून ३५ वर्षीय तरुण चालकाचा जागीच मृत्यू झाला. ही धक्कादायक घटना रविवारी मडकी गावाजवळ घडली आहे. सुमित बनकर (३५, रा. चंद्रपूर) असे मृत वाहन चालकाचे नाव आहे. सुमित बनकर हे ६ सीटर ट्रॅव्हलर घेऊन चंद्रपूरवरून चिखलदरा येथे आले होते. त्यांच्या वाहनात चंद्रपूरातील २२ महिलांचा समावेश असलेला थोगा गृप होता. एक मुलगीही त्यांच्यासोबत होती. अशा एकूण २० महिला पर्यटनासाठी शनिवारी चिखलदयाला आले होते. शनिवारी पर्यटन केल्यानंतरत्यांनी मुक्काम केला. रविवारी सकाळी काही पर्यटन स्थळांची पाहणी करून हे सर्व पर्यटक चंद्रपूरसाठी दुपारी दीड ते दोनवाजताच्या सुमारास चिखलदऱ्यातून बाहेर पडले. त्यानंतर अर्धा तासाने पर्यटकांचे वाहन मडकी गावानजीक असलेल्या आडनदी वळणावरपोहोचले. यावेळी ही दुर्दैवी घटना घडली.

### मदत करतानाच काळाची चालकावर झडप

दरम्यान वाहनातील एका महिला प्रवाशाने उलटी केली. चालक सुमित यांनी वाहन उभे केले.उतारावरील वाहन दरीच्या दिशेने जात असल्याचे लक्षात येताच सुमित यांनी वाहन अडवण्याचा आटोकाट प्रयत्न केला मात्र वाहनाचे वजन, उतार यामुळे वाहन थांबले नाही उलट सुमित यांना धडक देऊन वाहन झाडांच्या मधून दरीकडे सरसावले व समोर झाडावर धडकून थांबले. दोन वेळा मदत करताना चालकावर काळाने झडप घातली

# श्री संत गाडगे महाराज समाधी मंदिर येथे रोज मीष्ठांनअन्नदान

## वेगवेगळ्या अन्नदात्यातर्फे होणार दुपारी बारा वाजता अन्नदान



### बाबांच्या पुण्यतिथी उत्सवाला सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

गाडगे बाबा नगर श्री संत गाडगे महाराज समाधी मंदिर गाडगेबाबा नगर अमरावती या संस्थेचे विश्वस्त संस्थेचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या ठिकाणी रोज दुपारी बारा वाजता बाबांच्या पुण्यतिथी उत्सव निमित्त गोड भोजनदान करण्यात येणार असून आज पहिला दिवस कै. नामदेवराव रोडे यांच्या स्मरणार्थ रोडे परिवार राधानगर अमरावती पुरणपोळी १५ डिसेंबरला स्वर्गीय दिगंबर आप्पाजी कुऱ्हे यांच्या स्मरणार्थ कुरे परिवार सात खिराडी अमरावती, १६ डिसेंबर संतोष भुवन तर्फे गुप्ता यांच्या यांच्या स्मरणार्थ तर स्वर्गीय शेषराव गजाननराव सवाई यांचे स्मरणार्थ स्वर्गीय प्रमिलाबाई सवाई तर्फे सवाई परिवार गाडगेबाबा नगर तर १८ डिसेंबरला कै. गोविंदराव अच्युतराव उर्फ अण्णासाहेब देशमुख यांचे स्मृती प्रित्यर्थ श्रीमती प्रतिभाताई देशमुख समता नगर मूर्तिजापूर, प्रशांत देशमुख दादर मुंबई यांच्यातर्फे १९ डिसेंबरला श्रीमती विजयाताई रामरावजी मोहोळ राधानगर अमरावती वीस डिसेंबरला स्वर्गीय सुरेंद्र जी झुंबर व स्वर्गीय विनोद भुम्बर स्मृती पिक्चर चा श्री सौरभ भुंबर यांच्यातर्फे गाडगेबाबा नगर अमरावती तर्फे मिस्टन्न अन्नदान होणार आहे तरी सर्व भाविक भक्तांनी पुण्यतिथी महोत्सवाचा उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख व्यवस्थापक प्रकाश महात्मे यांनी केले आहे.





### श्री संत गाडगे महाराज पुण्यतिथी महोत्सवाचा शुभारंभ

अमरावती. प्रथम भजन पुष्प बालाजी महिला भजन मंडळ काटपुर धामणगाव येथील महिलांचे श्री संत गाडगेबाबांचा पुण्यतिथी महोत्सवामध्ये सादर केलेलं भजनी मंडळ प्रमुख कल्पनाताई विलास महल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली महिला मंडळ सहभागी झाले आहेत पेटी मास्तर विलास भाकरे तर तबलावादक दिलीप बहादुरकर व तसेच त्यांच्या महिला मंडळाचे प्रामुख्याने कल्पनाताई मोहल्ले रेखाताई भाकरे प्रेमाताई काळे नीलिमा मले अलका काळे सिंधुबाई काळे मीनाताई काळे, अंजू ताई काळे रमाताई काळे लताबाई काळे या सर्व महिला मंडळ सहभागी झालेले आज प्रथम दिवस भागवत शुभारंभ यजमानपद राहुल भरत रेडे सौ. माधुरीताई रेडे यांच्या हस्ते कलास्थापना करण्यात आली.

# सा.बा. वि. च्या तांत्रिक मान्यतेची किचकट प्रक्रिया बंद करा

## सिंचनाचे पाणी बंदिस्त पाईपद्वारे द्यावे आ प्रतापदादा अडसड यांची विधानसभेत मागणी



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१५धामणगाव रेल्वे** – एकीकडे कोट्यावधीची कामे मंजूर झाल्यानंतर एखाद्या कामाची तांत्रिक मान्यता घ्यावयाची असल्यास तब्बल एक ते दोन महिने लागतात, कामे वेळेवर होत नाहीं,सार्वजनिक बांधकाम विभागाची सुरू असलेली तांत्रिक मान्यतेचे किचकट प्रक्रिया बंद करून केवळ एक आठवड्यात ही मान्यता द्यावी तांत्रिक मान्यतेसाठी शासनाची शासनाला देण्यात येणारी रक्कम क्षमावित करावी तसेच सिंचनासाठी कॅनल द्वारे दिल्या जाणाऱ्या पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्य होतो, बंदिस्त पाईपद्वारे सिंचनाची व्यवस्था करून निधी मंजूर करावा अशी मागणी विधानसभेत आमदार प्रतापदादा अडसड यांनी केली. हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विरोधकांच्या कलम २९३ प्रस्तावावर बोलताना आमदार प्रतापदादा अडसड यांनी विविध मुद्दे विधानभवनात मांडले .विदर्भ व मराठवाडा यांच्या अनुशेष काँग्रेसच्या राज्यात निर्माण झाला त्यामुळे ही स्थिती निर्माण झाली आहे. मविआ च्या सरकार मध्येच ही वैधानिक विकास महामंडळे बंद पडली आहे. महायुतीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कार्यकाळात विदर्भात सर्वाधिक निधी मिळाला आहे शेतकऱ्याना ऐतिहासिक मदत या सरकारने दिली आहे सोलरच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज मिळत आहे, ११२ कॉल वरून महिलांना त्वरित मदत मिळत असल्याने राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण कमी झाले आहे.बळीराजा प्रकल्प समिती ला ९०० कोटी ची मदत मुख्यमंत्री फडवणीस यांनी जाहीर करून स्नानुग्रह मिळणे सुरू झाले असल्याचे मुद्दे आमदार प्रतापदादा अडसड यांनी विधानसभेत मांडले.

# मोर्शी तालुका कृषी अधिकारी कार्यालय मोर्शी शहरात स्थलांतरित करा !

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती** – मोर्शी तालुका कृषी अधिकारी कार्यालय हे चांदूर बाजार मार्गावरील मोर्शी शहरापासून ३ किलोमीटर अंतरावर आहे. येरला फार्ममधून हे कार्यालय मोर्शी शहरात स्थलांतर करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस हितेश साबळे यांनी महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेऊन निवेदन देऊन केली.मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी आठ वर्षांपूर्वी तालुका कृषी कार्यालय, उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय मोर्शी येथील बसस्थानकापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या मनोरमा कॉम्प्लेक्समध्ये होते. त्यामुळे तालुक्यातील शेतकरी तालुका कृषी कार्यालयात जाऊन आपली शेतीविषयक कामे करून घेत होते. शेतकऱ्यांना कृषी खात्याच्या योजनांचा लाभ घेता येत होता. पण, कृषी विभागाने तालुका कृषी




अधिकारी कार्यालय सुमारे आठ वर्षांपूर्वी चांदूर बाजार मार्गावरील तालुका रोपवाटिका केंद्र येथे हलविले. आजच्या स्थितीत ज्या ठिकाणी तालुका कृषी कार्यालय आहे, त्या ठिकाणी शेतकऱ्यांना जाण्याची कोणतीही सोय नाही व्यवस्था नाही. कार्यालयात ये–जा करण्यासाठी जवळपास शंभर रुपये खर्च होत असून शेतकऱ्यांना नाहक भुर्दंड सोसावा लागत आहे. तालुका कृषी अधिकारी कार्यालय शहरापासून दूर असल्यामुळे या ठिकाणी नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणीसुद्धा मिळत नाही. वीजपुरवठा सतत चालू–बंद होत राहतो. त्यामुळे कार्यालयातील कर्मचाऱ्यांना कामे करताना अनेक त्रासाला समोर जावे लागत असतांना तालुका कृषी कार्यालयातील काही अधिकारी फिल्डवर राहतात, तर बहुसंख्य महिला कर्मचारी कार्यालयात असतात. त्यामुळे महिलेच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मोर्शीतील सर्व शासकीय कार्यालये अमरावती व वरूड या मुख्य रस्त्यावर आहेत. त्यामुळे कृषी अधिकारी कार्यालय कृषी विकास व सुरक्षा दृष्टीने शहरात मुख्य रस्त्यावर हलविण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस हितेश साबळे यांच्यातर्फे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन देऊन करण्यात आली त्यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी मोर्शी तालुका कृषी अधिकारी कार्यालय मोर्शी शहरामध्ये स्थलांतरित करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिल्यामुळे मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना लवकरच दिलासा मिळणार असल्याची माहिती हितेश साबळे यांनी दिली.

### हितेश साबळे यांची कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे मागणी !

# कोट्यवधींचे इस्टीमेट, पण बांधकामात दगडाचा भुसा

## सार्वजनिक बांधकाम विभागाची उघड उघड डोळेझाक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अचलपूर** अचलपूर सार्वजनिक बांधकाम विभागीय कार्यालयाच्या अक्षरशः हाकेच्या अंतरावर सुरू असलेल्या दोन शासकीय इमारतींच्या बांधकामात वाळूऐवजी सर्रास दगडाचा भुसा (डस्ट) वापरला जात असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. कोट्यवधी रुपयांचे अंदाजपत्रक (इस्टीमेट) असलेल्या या बांधकामात शासनाने ठरवून दिलेले निकष अक्षरशः पायदळी तुडवले जात असून, कंत्राटदाराचे करोडो रुपये वाचविण्यासाठी दर्जाशी तडजोड केली जात आहे, असा संतप्त सवाल दक्ष नागरिक उपस्थित करीत आहेत.विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकाराची माहिती स्थानिक नागरिकांनी कार्यकारी अभियंता नरेंद्र वानखडे यांना वेळोवेळी दिली असतानाही बांधकामात दगडाच्या भुस्याचा वापर थांबलेला नाही. त्यामुळे सा. बां. विभागाचे कार्यकारी अभियंता धृतराष्ट्र बनले आहेत का? असा थेट प्रश्न आता उपस्थित होत आहे.

### निकृष्ट दर्जाचे बांधकाम

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाच्या अगदी नजीकच कुटीर रुग्णालय आहे. याच रुग्णालय परिसरात कोट्यवधी रुपये खर्च करून भव्य, बहुमजली शासकीय इमारतीचे बांधकाम सुरू असून सुमारे १० टक्यांहून अधिक काम पूर्ण झाले आहे.प्रत्यक्ष पाहणीदरम्यान इमारतीलगत मोठ्या प्रमाणावर दगडाचा भुसा साठवलेला स्पष्टपणे दिसून आला. विशेष म्हणजे, या ठिकाणी वाळूचा एकही कण आढळून आला नाही, ही बाब अधिक धक्कादायक आहे.

### प्रत्यक्षात भुसाचाच वापर

या संदर्भात पुन्हा विचारणा केली असता, कार्यकारी अभियंता




नरेंद्र वानखडे यांनी विभागांतर्गत झालेल्या बैठकीत दगडाचा भुसा वापरू नये, अशा स्पष्ट सूचना दिल्याचा दावा केला होता. मात्रप्रत्यक्ष परिस्थिती याच्या पूर्णपणे उलट असून, भुस्याचा वापर थांबण्याऐवजी आणखी वाढल्याचेच चित्र दिसून येत आहे.व्हिडिओ पुरावे; कारवाई शून्य हा गैरप्रकार वरिष्ठांच्या निदर्शनास आणण्यासाठी व्हिडिओ शूटिंग करून ते थेट कार्यकारी अभियंता वानखडे यांच्या व्हॉट्सपवर पाठवण्यात आले, तसेच भ्रमणध्वनीद्वारेही सविस्तर माहिती देण्यात आली.मी १० मिनिटांत घटनास्थळी येतो, असे आश्वासन देण्यात आले. मात्र प्रत्यक्षात कोणतीही पाहणी, चौकशी किंवा कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद ठरत आहे. दिखाव्यासाठी वाळू ,प्रत्यक्षात भुसाच प्रकरण उघडकीस आल्यानंतर फक्त दिखाव्यासाठी बांधकामस्थळी थोडी वाळू आणून ठेवण्यात आली आहे. प्रत्यक्षात मात्र अजूनही दगडाचा भुसाच वापर सुरू असल्याचे स्पष्ट दिसून येते.शासनाने वाळूला पर्याय म्हणून क्रश सँड वापरण्याची परवानगी दिलेली आहे. मात्र येथे क्रश सँड उपलब्ध नसताना, क्रशर क्रशरमधून निघणारा निकृष्ट, कोणत्याही बांधकामासाठी अयोग्य असा भुसा वापरण्यात येत आहे. हा भुसा भविष्यात इमारतीच्या मजबुतीस मोठा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाच्या नाकावर टिच्चून असा प्रकार घडत असेल, तर दूरच्या ठिकाणच्या कामांची अवस्था काय असेल? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.आता तरी या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई होणार की नेहमीप्रमाणे हा विषय दाबला जाणार? याकडे अचलपूर आणि परतवाड्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# नांदगाव नगर पंचायत रोजगार हमी योजना लागू करा

## अतिवृष्टीने खचलेल्या विहिरीचे बांधकामाचे अनुदान द्या

### रोजगार हमी योजना लागू नसतांना नांदगाव नगरपंचायतची कर वसुली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५नांदगाव खंडेश्वर–** स्थानिक नगरपंचायत ला रोजगार हमी योजना लागू नसताना नगर पंचायत रो.ह.योजनेची कर वसुली करीत असून सन २०१४ पासून सदर योजनेचा लाभ मिळत नाही म्हणून तात्काळ योजना लागू करून नगरपंचायत क्षेत्रातील नागरिकांना सदर योजनेचा लाभ द्यावा अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे प्रकाश मारोटकर यांनी रो.ह.यो. मंत्री भरत गोगावले व राज्याचे आयुक्त यांना निवेदन सादर करून केली. सन २०१४ ला नांदगाव शहराला नगरपंचायत चा दर्जा मिळाला असून नगरपंचायत अस्तित्वात येऊन १० वर्षाचा कालावधी होत असून स्थानिक शहरातील नागरिकांना शेतकऱ्यांना रोजगार हमी योजने अंतर्गत चा लाभ मिळाला नाही १० वर्षात शेकडो शेतकरी धडक सिंचन विहीर योजना गोठा शेड वृक्ष नर्सरी इत्यादी योजनेपासून वंचित आहे. रो.ह. यो अंतर्गत कुठल्याच योजना लागू नसल्याने मजुरांचे जॉब कार्ड सुद्धा मिळत नसल्याने मजुरांना रो.ह. योजनेच्या कामावर काम करता येत नाही. वास्तविक शासनाने १६ एप्रिल २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करून क वर्ग नगरपरिषद नगरपंचायती क्षेत्रात राज्य रोजगार हमी योजना राबविण्याचा आदेश सुद्धा काढला आहे मात्र सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत नसल्याने न.पं. क्षेत्रातील मजुरांना कुशल, अकुशलची कामे सुद्धा मिळत नाही.तसेच सन २०२५ मध्ये अतिवृष्टीने खचलेल्या विहिरींना बांधकाम करण्यासाठी ३० हजार रुपयांचे अनुदान देण्याचे राज्य सरकारने कबूल करून रो.ह.यो.अंतर्गत सदरचे अनुदान देण्याचे शासन परिपत्रक सुद्धा काढण्यात आले असतांना अद्याप अनुदानाचे वाटप करण्यात आले नाही त्यामुळे नांदगाव नगरपंचायत क्षेत्रात रो.ह.यो. लागू करावी व खचलेल्या विहिरींचे अनुदान देण्यात यावे अशा मागणीचे निवेदन रो.ह.यो.मंत्री भरत गोगावले व रो.ह.यो. आयुक्त यांना सादर केले.

नांदगाव नगरपंचायत क्षेत्रात रोजगार हमी योजना लागू नसतांना सदर योजनेचा कुठलाच लाभ स्थानिक नागरिकांना मिळत नसतांना नगरपंचायत रो.ह.योजनेची कर वसूल करू शकत नाही तरी सुद्धा न.पं.कर वसुली करीत आहे असे मत प्रकाश मारोटकर यांनी व्यक्त केले.



# अचलपूरातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना गती

## आमदार प्रवीण तायडे यांच्या प्रयत्नांना यश, जलसंपदा मंत्र्यांची हिरवी झेंडी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१५अचलपूर** अचलपूर विधानसभा मतदारसंघातील वर्षानुवर्षे दायित्वाअभावी रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना अखेर गती मिळाली असून, आमदार प्रवीण तायडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. हिवाळी अधिवेशनात आमदार तायडे यांनी या प्रकल्पांसाठी ठामपणे मागणी मांडताच जलसंपदा मंत्री गिरीशजी महाजन यांनी संबंधित सर्व मागण्यांना तात्काळ मंजुरी देत हिरवी झेंडी दाखवली.अचलपूर मतदारसंघातील बोर्डी नाला प्रकल्प, राजुरा प्रकल्प, राजनापूर्णा बॅरेज प्रकल्प आणि वासनी मध्यम प्रकल्प असे चार प्रमुख सिंचन प्रकल्प केवळ दायित्वाअभावी अनेक वर्षांपासून रखडलेले होते. परिणामी सुमारे ११,९३० हेक्टर शेती क्षेत्र सिंचनापासून वंचित राहिले असून हजारो शेतकऱ्यांना याचा फटका बसत होता.वासनी मध्यम प्रकल्पावर आतापर्यंत ६४३.५१ कोटी रुपयांचा खर्च झालेला असून या प्रकल्पामुळे ५,०४३ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. मात्र सन २०१६–१७ पासून निधीअभावी काम थांबले होते.



हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ६५.६५ कोटी रुपयांचे दायित्व मंजूर करणे अत्यावश्यक असल्याचे आमदार तायडे यांनी सभागृहात ठामपणे मांडले. तसेच उर्वरित बोर्डी नाला, राजनापूर्णा बॅरेज आणि राजुरा प्रकल्पांना तुलनेने अल्प निधीची आवश्यकता असून ते तातडीने पूर्ण करता येतील, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.सिंचनाच्या अभावामुळे कोरडवाहू शेती करणारा शेतकरी आजही निसर्गाच्या भरवशावर असल्याचे नमूद करत, हे प्रकल्प पूर्ण झाल्यास शेती उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती भक्कम होईल, असा विश्वास आमदार प्रवीण तायडे यांनी व्यक्त केला.

# तब्बल २१ लाखांचा रेशनचा तांदूळ जप्त

## बाळापूरहून चालला होता गोंदियाला : ३० लाखांचा ट्रक लागला पोलिस ठाण्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती :** ऑनलाइन वितरण प्रणालीमुळे रेशनचे धान्य काळ्या बाजारात विक्रीसाठी जात नाही, असा दावा पुरवठा विभाग करत असला तरी रेशनच्या तांदळाची काळ्या बाजारात मोठ्या प्रमाणात विक्री सुरू असल्याचे प्रकरण उघडकीस आले. विदर्भात गोंदिया है काळ्या बाजारातील रेशनच्या तांदळाच्या खरेदी, विक्रीचे महत्त्वाचे केंद्र झाले आहे. यादरम्यान बाळापूर येथून समृद्धी मार्गे गोंदिया येथे वाहतूक होणार असल्याची माहिती मिळताच तळेगाव दशासर पोलिस पथकाने सापळा रचून ट्रक पकडला. ही



कारवाई तळेगाव दशासर ठाण्याच्या हद्दीतील समृद्धी महामार्ग चैनल ११५ येथे करण्यात आली. या कारवाईत २१ लाख २५ हजार रुपये किमतीचा रेशनचा तांदूळ व ३० लाख रुपये किमतीचा ट्रक जप्त केला आहे.

धामणगाव रेल्वे येथील पुरवठा विभागातील निरीक्षक अधिकारी प्रविण भागवत (५६) यांच्या तक्रारीवरून तळेगाव दशासर पोलिसांनी १३ डिसेंबर रोजी रात्री आरोपी इरफान खान हामिद खान (३२ रा. मकाई, लालगंज, प्रतापगढ़, उत्तर प्रदेश) व एका अनोळखी इसमाविरुद्ध आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (इसी ॲक्ट) अन्वये गुन्हा दाखल केला. बाळापूर येथून एमएच ४० सीए ८२८१ या ट्रकमधून रेशनच्या तांदळाची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेतील एका अंमलदाराला मिळाली. मात्र, पथक दूर असल्याने ती माहिती तळेगाव दशासर पोलिस ठाण्याला देण्यात आली. स्थानिक पोलिसांनी तो ट्रक अडवून पुरवठा विभागाशी संपर्क साधला तथा ट्रकमधील मालाची चौकशी केली. चालकाकडे महाॲग्रो अशी पावती आढळून आली. त्यात एकूण ६१० कट्टे (३०५ क्विंटल) तांदूळ आढळून आला.

### तांदळात आढळले एफआरके कण

पुरवठा निरीक्षक प्रवीण भागवत यांनी त्या तांदळाची पाहणी केली असता, केवळ रेशन व्यवस्थेतील तांदळात त्यात एफआरके कण आढळून आले. ते असल्याने त्या ट्रकमधील तो तांदूळ प्रथमदनी रेशनवा असल्याचे मत भागवत यांनी व्यक्त केले. डीएसओंच्या आदेशानुसार भागवत यांनी तक्रार दिली.


### काय असतात एफआरके कण?

एफआरके अर्थात फोर्टिफाईड राइस कर्नल, फोर्टिफाइड तांदूळ म्हणजे असा तांदूळ ज्यात लोह, फॉलिक ॲसिड आणि जीवनसत्त्व १२ सारखी पोषक तत्वे असतात.

## प्रभाग क्रमांक ११ रुख्मिणीनगर-फ्रेजरपुरा मधून

# इंजि. कमल मालवीय यांची दावेदारी भक्कम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती** अमरावती महानगर पालिके च्या आगामी निवडणुकीच्या रणधुमाळीला वेग आला असून विविध प्रभागांतून इच्छुक उमेदवारांची नावे पुढे येत आहेत. त्यातच प्रभाग क्रमांक ११ रुख्मिणीनगर–फ्रेजरपुरा येथून इंजिनिअर कमल मालवीय यांची दावेदारी भक्कम मानली जात आहे. स्थानिक पातळीवर त्यांना मिळणारा वाढता पाठिंबा आणि जनसंपर्कामुळे ते या प्रभागातील मजबूत दावेदार ठरत असल्याचे चित्र आहे.




इंजि. कमल मालवीय हे मनमिळावू स्वभाव, सर्व सामान्य नागरिकांशी थेट संवाद आणि प्रत्येकाला सोबत घेऊन काम करण्याच्या भूमिकेसाठी ओळखले जातात. प्रभागातील नागरी समस्या, मूलभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, तसेच युवक व महिलांच्या प्रश्नांबाबत त्यांनी सातत्याने सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यांच्या या कार्यशैलीमुळे विविध सामाजिक घटकांमध्ये त्यांची लोकप्रियता वाढत असून नागरिकांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण झाले आहे.स्थानिक नागरिकांच्या मते, विकासकामां बाबत स्पष्ट दृष्टिकोन, तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करून समस्या सोडवण्याची क्षमता आणि प्रशासनाशी समन्वय साधण्याची हातोटी हे त्यांचे मोठे प्लस पॉईंट आहेत. त्यामुळे आगामी निवडणुकीत ते प्रभावी उमेदवार ठरू शकतात, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.भाजपाने प्रभाग क्रमांक ११ मधून इंजि. कमल मालवीय यांना उमेदवारी दिल्यास, या प्रभागातून भाजपचे तिन्ही उमेदवार विजयी होण्याची क्षमता त्यांच्या नेतृत्वात आहे, असे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. सध्या सुरू असलेल्या राजकीय हालचालींमुळे प्रभाग क्रमांक ११ कडे सर्वांचे लक्ष लागले असून, येत्या काळात येथील लढत अधिक रंगतदार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.–

## जिद्दीच्या जोरावर यशाचे शिखर!

# न्यूकॅसल विद्यापीठातून बडनेराच्या मंजुषा बनसोड यांचे दैदीप्यमान यश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती / न्यूकॅसल (यू.के)** परदेशातील कठीण परिस्थिती, प्रचंड स्पर्धा आणि अभ्यासाचा तीव्र ताण असतानाही अडचणींना न घाबरता जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या जोरावर यश मिळवता येते, हे बडनेरा शहरातील कु. मंजुषा प्रकाश बनसोड यांनी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे. इंग्लंडमधील नामांकित न्यूकॅसल युनिव्हर्सिटी, यू.के. (टड वर्ल्ड रँकिंग ११०, रसेल ग्रुप युनिव्हर्सिटी) येथून त्यांनी चडल ळप ईीीळपर्शीी –परश्रींळली ही पदवी चशीळीं श्रेणीत यशस्वीरीत्या संपादन केली आहे.दि. १ डिसेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात त्यांना पदवी प्रदान करण्यात आली. हा अभ्यासक्रम अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक मानला जातो. मात्र मंजुषा या जिद्दी, मेहनती आणि ध्येयावर ठाम असलेल्या विद्यार्थिनी असल्याने त्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या बळावर हे मोठे यश



संपादन केले.परदेशात शिक्षण घेत असताना कुटुंबीयांना सतत काळजी वाटत होती; मात्र मंजुषाच्या चिकाटीने, संयमाने आणि कठोर मेहनतीने हे स्वप्न साकार झाले. तिच्या या यशामुळे कुटुंबासह बडनेरा शहरात आनंद व अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल नातेवाईक, मित्रपरिवार, शिक्षकवर्ग तसेच विविध क्षेत्रांतून तिचे अभिनंदन होत आहे. भविष्यात ती बिझनेस ॲनालिटिक्स क्षेत्रात उल्लेखनीय व भरीव कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.बडनेरा शहराची रहिवासी असलेल्या मंजुषा बनसोड यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन करून बडनेरा शहराचे नाव उज्ज्वल केले आहे.

# भाविकांच्या कारला समृद्धीवर अपघात; दोन तरुणांचा मृत्यू

## शिर्डीला जाताना मंगरूळ चव्हाळा ठाणे हद्दीत अपघात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती** समृद्धी महामागनि शिर्डीला जाणाऱ्या भाविकांच्या कारला नांदगाव खंडेश्वरजवळ भीषण अपघात झाला. या अपघातात कारमधील दोन तरुणांचा मृत्यू झाला आहे. याचवेळी दोघे जखमी झाले आहेत. हा अपघात ११ डिसेंबरला उशिरा रात्री झाला होता. भाविकांच्या कारसमोर अचानक बोलेरो वाहन आले. त्यामुळे कार बोलेरोवर जाऊन धडकली व अपघात झाला आहे.



विक्रम अशोक सौरंगपते (३४, रा. दत्तचौक, अमराईपुरा, यवतमाळ) आणि मंगेश महादेवराव खिरसान (रा. तळेगाव बारी) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या तरुणांचे नाव आहे. याच अपघातात मयूर दीपक दोनाडकर (२९) आणि अनुकूल मनोज यादव (रु, दोघेही रा. दत्तचौक, व्यवतमाळ) हे दोघे जखमी झाले आहेत. विक्रम, मंगेश, मयूर व अनुकूल हे चौघेहीमित्र आहेत. ते स्विफ्ट डिझायर कारने यवतमाळवरून शिर्डीसाठी निघाले होते. यादरम्यान रात्री अपघात झाला.

### लेन कटिंगमुळे झाला अपघात

समृद्धी महामार्गावर बहुतांश वाहनांच्या गती सुसाट असतात. त्यामुळे ओव्हरटेक व लेन सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. हा कटिंग करताना वाहनचालकांना प्रचंड झाल्याचे पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत अपघात चुकीच्या पद्धतीने लेन कटिंगमुळे समोर आले आहे.

सदर बोलेरोवाहनचालकाने एका लेन वरून स्विफ्ट डिझायर असलेल्या लेनवर अचानक कार होती. अचानक लेन कट केल्यामुळे कार आणली.

त्यावेळी मागून कार भरधाव येत चालकाला वाहन नियंत्रित करणे शक्य झाले नाही व भरधाव कार बोलेरोवर मागून जाऊन पोलिसांनी दिली आहे. धडकली, अशी माहिती मंगरूळ चव्हाळा पोलिसांनी दिली आहे.

# राजापेठ गुन्ह्यात फरार आरोपी आदेश उर्फ एअरटेल संतोष रघुवंशी गुन्हे शाखेच्या ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती** पोलीस ठाणे राजापेठ, अमरावती शहर येथे दाखल गंभीर गुन्ह्यात गैरकायदेशीर जमाव जमवून फिर्यादीवर प्राणघातक हल्ला व दहशत निर्माण केल्याप्रकरणी पाहिजे असलेला आरोपी आदेश उर्फ एअरटेल संतोष रघुवंशी (वय १८, व्यवसाय – मजुरी, रा. जेवड नगर, गल्ली नं. ०१, अमरावती) यास अमरावती शहर गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे.शुभम जनबंधु यांच्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राजापेठ येथे दाखल करण्यात आला होता.सदर गुन्ह्यात २० ते २२ आरोपींनी संगनमत करून हातात तलवारी घेऊन फिर्यादीस जीवे मारण्याचा प्रयत्न केला तसेच जातीवाचक शिवीगाळ



केली. याचवेळी फिर्यादीच्या घराजवळ दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने १० ते १२ दुचाकी वाहनांची तोडफोड करण्यात आली होती.

गुन्हा घडल्यापासून फरार असलेला आरोपी आदेश उर्फ एअरटेल संतोष रघुवंशी अटक टाळण्यासाठी विविध ठिकाणी लपून राहत होता. गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपीचा शोध घेऊन त्यास जबाहर नगर ग्राउंड येथून ताब्यात घेतले.

पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी त्यास पोलीस ठाणे राजापेठ यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात गुन्हे शाखेचे स.पो.नि. मनीष वाकोडे व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# गडगेश्वर प्रभागातून राहुल माटोडेंची महापालिका निवडणुकीत एन्ट्री

## उदयोन्मुख नेतृत्व म्हणून राहुल माटोडे यांची ओळख

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१५अमरावती** शिवसेना (शिंदे गट) चे आक्रमक व तरुण नेतृत्व राहुल माटोडे हे गडगेश्वर प्रभाग क्रमांक १७ मधून आगामी अमरावती महानगर पालिका निवडणूक लढवणार असल्याच निश्चित झाले असुन शाखाप्रमुख ते युवासेना महानगर प्रमुख असा त्यांचा राजकीय प्रवास असून, विविध आंदोलनांमध्ये त्यांनी प्रभावी नेतृत्व केले आहे. जनतेच्या दैनंदिन समस्या, नागरी सुविधा व मूलभूत प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारे उदयोन्मुख नेतृत्व म्हणून राहुल माटोडे यांची ओळख आहे. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी गरीब व गरजू निराधार महिलांना शिलाई मशीनचे वाटप करून स्वावलंबनाची दिशा दिली आहे. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिला विद्यार्थ्यांना सायकली उपलब्ध करून



देत शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. विभागात २४ तास सक्रिय राहून नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी तत्पर असणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे.विशेष म्हणजे, नगरसेवक नसतानाही प्रभावी पाठपुरावा व आक्रमक भूमिकेमुळे त्यांनी प्रभागात सुमारे एक कोटी रुपयांची विकासकामे मार्गी लावली आहेत. नम्रता, कोणाच्याही हाकेला तत्काळ प्रतिसाद देणारे व मदतीसाठी सदैव पुढे असणारे नेतृत्व म्हणून नागरिकांमध्ये परिचित आहेत. आगामी निवडणुकीत त्यांची उमेदवारी गडगेश्वर प्रभागात राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे.

# दागिने लुटणाऱ्या चार महिलांना अटक

## धामणगाव रेल्वेमध्ये एका प्रसिद्ध ज्वेलर्समध्ये चोरी, ग्रामीण गुन्हे शाखेची कारवाई ७३,००० रुपयांचा माल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५धा.रेल्वे** शहरातील प्रतिष्ठित ज्वेलर्समध्ये ग्राहक असल्याचे भासवून लोकांचे सोने–चांदीचे दागिने लुटणाऱ्या चार महिलांना स्थानिक ग्रामीण गुन्हे शाखेने अटक केली आहे. आरोपींकडून एकूण ७३,००० रुपयांचा चोरीचा माल जप्त करण्यात आला आहे. नझमीन परवीन अजीजुद्दीन (४५, जीरा बावडी, इस्लाम चौक, अकोला), मेहरुनिसा अब्दुल शफी (६८, संकल्प कॉलनी, अकोला), नसरीन परवीन मो. शकील (४९, सोनटक्के प्लॉट, अकोला) आणि रुक्साना परवीन शेख अजीज (३०, सोनटक्के प्लॉट, अकोला) अशी अटक करण्यात आलेल्या चार आरोपींची नावे आहेत.

प्राप्त माहितीनुसार, धामणगाव रेल्वे



स्थानकावरील रहिवासी महेश वर्मा यांनी ३० नोव्हेंबर रोजी दत्तापूर पोलिस ठाण्यात तक्रार – दाखल केली. २८ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ७वाजताच्या सुमारास, तीन बुरखाधारी महिलांनी प्रथम ज्वेलर्समध्ये ग्राहक असल्याचे भासवून प्रवेश केला, दुकानदाराचे लक्ष विचलित केले आणि ४ ग्रॅम सोन्याची अंगठी चोरली. त्यांनी त्याऐवजी ट्रे वर ४ ग्रॅमची बनावट अंगठीठेवली. त्याचप्रमाणे, शारदा ज्वेलर्समध्ये, चार बुरखाधारी महिलांनी हुशारीने सुमारे १४० ग्रॅम वजनाचे चांदीचे पायल चोरले. दत्तापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ग्रामीण गुन्हे शाखा या प्रकरणाचा तपास करत आहे. शनिवारी, एलसीबी चांदूर रेल्वे उपविभागाचे पथक परिसरात गस्त घालत असताना त्यांनामाहिती मिळाली की मागील फसवणुकीत सहभागी असलेल्या महिला पुन्हा असाच गुन्हा करण्याच्या उद्देशाने धामणगाव रेल्वे स्थानक परिसरात आहेत. माहितीवरून एलसीबी पथकाने महिला पोलिस कर्मचाऱ्यांच्या मदतीने स्टेशन परिसरातून नाझमीन परवीन अजीजुद्दीन, मेहरुनिसा अब्दुल शफी, नसरीन परवीन मोहम्मद शकील आणि रुक्साना परवीन शेख अजीज या चार महिलांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी फसवणुकीची कबुली दिली. पोलिसांनी एकूण ७३,००० किंमतीचा चोरीचा माल जप्त केला, ज्यामध्ये ०.४ ग्रॅम सोन्याची अंगठी आणि अंदाजे १३८ ग्रॅमचांदीचे पायल यांचा समावेश आहे. अटक केलेले आरोपी आणि जप्त केलेला माल दत्तापूर पोलिस ठाण्यात सुपूर्द करण्यात आला आहे

# मोझरीत अखिल भारतीय खुले कबड्डी सामने

## तयारी अंतिम टप्प्यात, क्रीडाप्रेमींमध्ये उत्साह

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती** – तुकड्यादास क्रीडा मंडळ, मोझरी–गुरुदेव नगर यांच्या वतीने स्व. गणेशराव ठाकरे व स्व. प्रविण लोखंडे यांच्या पावन स्मृतीप्रित्यर्थ अखिल भारतीय भव्य खुले कबड्डी सामने (महिला व पुरुष गट) मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आले आहेत. हे सामने १९, २० व २१ डिसेंबर २०२५ रोजी मोझरी येथे पार पडणार असून स्पर्धेची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. या क्रीडा महोत्सवामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन माननीय आमदार संजय खोडके (विधानपरिषद) व आमदार सौ. सुलभा खोडके (अमरावती विधानसभा) यांच्या शुभहस्ते होणार आहे. उद्घाटन सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणून 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम प्रसिद्ध अभिनेते अरुणजी कदम उपस्थित राहणार असून, त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत येणार आहे.



कार्यक्रमाचे अध्यक्षपद श्री जनार्दन पंत बोथे, सचिव अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळ, गुरुकुंज आश्रम हे भूषविणार आहेत. तसेच सुरेखाताई ठाकरे, संतोष महात्मे (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस), दिलीपभाऊ भुयार (तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस), प्रकाशभाऊ पडोळे (कार्याध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस), प्रकाशदादा मकरमपुरे तसेच मोझरी व गुरुदेव नगरचे सरपंच यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

बक्षीस वितरण सोहळ्यास माननीय जिल्हाधिकारी, अमरावती तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी उपस्थित राहण्याची शक्यता असल्याने या स्पर्धेचे महत्त्व अधिक वाढले आहे. आयोजकांच्या मते, या स्पर्धेमुळे मोझरीसारख्या ग्रामीण भागाला राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळणार आहे.

तुकड्यादास क्रीडा मंडळाचे अध्यक्ष अविनाश ठाकरे म्हणाले की, ग्रामीण भागातील होतकरू खेळाडूंना राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि कबड्डी या भारतीय खेळाला चालना देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी मोझरी व गुरुदेव नगरच्या ग्रामवासी व कार्यकर्त्यांचे मोलाचे सहकार्य लाभत असून, मोठ्या संख्येने खेळाडू व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# दर्यापूरच्या रामतीर्थ फाट्यावर कारला भीषण आग ; जिवीतहानी नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५ दर्यापूर–** तालुक्यातील येवदा पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या रामतीर्थ फाट्या जवळ एका धावत्या कारला भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना रविवार (दि.१४) सायंकाळी सात वाजता सुमारास घडली आहे. या आगीत चार चाकी



वाहन हे पूर्णतः जळून खाक झाले आहे .सदर आग शॉर्टसर्किट झाल्याने लागल्याची माहिती समोर आली आहे. कार चालक तात्काळ बाहेर निघाल्याने जीवीतहानी टळली आहे. घटनेतील आगग्रस्त चारचाकी वाहन अकोल्या जिल्ह्यातील असून वाहन चालक हा दर्यापूर तालुक्यातील जैनपूर येथे आपल्या नातेवाईकाकडे जात असल्याचे समजते. माहीती मिळताच दर्यापूर येथील नगरपालिकेचे अग्निशामक वाहन व पथकातील कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले व आगीवर नियंत्रण मिळविले.

# दोन वर्षांपासून थांबलेली वाळू विक्री पुन्हा सुरू

## अमरावती जिल्ह्यात १५ कोटींचा लिलाव, ३८ घाटांची प्रक्रिया पूर्ण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

अमरावती जिल्ह्यात दोन वर्षांच्या खंडानंतर वाळू घाटांचे लिलाव पुन्हा सुरू झाले आहेत. धोरणात्मक बदलांमुळे गेल्या दोन वर्षांपासून थांबलेली वाळू विक्री आता रुळावर आली आहे. या प्रक्रियेतून जिल्हा प्रशासनाला कोट्यवधी रुपयांच्या उत्पन्नाची हमी मिळाली आहे. यावर्षी एकूण वाळू व्यवहार १५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.

गेल्या दोन वर्षांत राज्य शासनाने वाळू धोरणात बदल करण्याचा निर्णय घेतल्यामुळे जिल्ह्यातील सर्व वाळू घाटांचे लिलाव रखडले होते. यामुळे जिल्हा प्रशासनाच्या तिजोरीत वाळू विक्रीतून एकही रुपया जमा झाला नव्हता. राज्याचे महसूल मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावर्षी वाळू घाटांचे लिलाव सुरू करण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण केली.

जिल्ह्यातील एकूण ५३ वाळू घाटांपैकी आतापर्यंत ३८ घाटांचे लिलाव पूर्ण झाले आहेत. या लिलावातून जिल्ह्याच्या तिजोरीत ११.७३ कोटी रुपये जमा होण्याची हमी मिळाली असून, त्यापैकी ९.७१ कोटी रुपये प्रत्यक्षात जमा झाले आहेत. उर्वरित १५ घाटांसाठीची लिलाव प्रक्रिया उद्या, सोमवारी पूर्ण केली जाणार आहे.

भूजल सर्वेक्षण विभागाने यावर्षीच्या लिलावासाठी ५३ वाळू घाटांना पर्यावरणीय मंजुरी दिली होती. खनिकर्म विभागाने लिलावाची प्रक्रिया सुरू केली, परंतु सुरुवातीला अपसेट प्राईस (शासनाने ठरवलेली किंमत) अधिक असल्याने त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. पहिल्या टप्प्यात केवळ २३ घाटांची लिलाव प्रक्रिया पूर्ण झाली.

त्यानंतर जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुन्हा दुसऱ्यांदा निविदा जारी करून लिलाव प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या टप्प्यात आणखी १५ घाटांसाठी खरेदीदार पुढे आले. उर्वरित १५ घाटांच्या लिलावातून तीन ते साडेतीन कोटी रुपये मिळण्याची शक्यता आहे, ज्यामुळे यावर्षीचा एकूण वाळू व्यवहार १५ कोटी रुपयांवर जाईल.

# प्राध्यापकांच्या पदोन्नती रखडल्या, आचारसंहितेचा अडसर नाही

## अधिकारी जाणीवपूर्वक निर्णय अडवत असल्याचा अखिल भारतीय शैक्षिक महासंघाचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

राज्यातील प्राध्यापकांच्या पदोन्नती प्रक्रिया सध्या नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे रखडली आहे. आचारसंहिता अडसर नसतानाही उच्च शिक्षण सहसंचालकांनी या फाईल्स थांबवल्याचा आरोप अखिल भारतीय शैक्षिक महासंघाने केला आहे.

महासंघाचे अध्यक्ष प्रा. प्रदीप खेडकर यांनी याविरोधात आवाज उठवला आहे. त्यांनी प्राध्यापकांना त्यांच्या पदोन्नतीच्या फाईल्स संबंधित कार्यालयात जमा करण्याचे आणि महासंघाला कळवण्याचे आवाहन केले आहे. प्राध्यापकांची स्थाननिश्चिती ही एक सहज प्रक्रिया असून ती आचारसंहितेत अडकवू नये, अशी महासंघाची भूमिका आहे.

पदोन्नती ही नवीन भरती नसून, ती आधीपासून सुरू




असलेल्या प्रक्रियेचाच एक भाग आहे. त्यामुळे कोणत्याही निवडणुकीची आचारसंहिता यासाठी अडसर ठरत नाही, असे महासंघाचे म्हणणे आहे. असे असतानाही अमरावतीसह राज्यातील काही उच्च शिक्षण सहसंचालक जाणीवपूर्वक पदोन्नतीचे प्रस्ताव थांबवून ठेवत आहेत.

या संदर्भात शैक्षिक महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांना विनंती केली होती. मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असला तरी, शासकीय यंत्रणेने ही प्रक्रिया थांबवून ठेवली आहे. राज्याच्या उच्च शिक्षण विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी आणि संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्याशीही चर्चा झाली, परंतु अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही.

यामुळे प्राध्यापकांमध्ये मोठा असंतोष पसरला असून, होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी शासनाची राहील, असे महासंघाने म्हटले आहे. प्रा. प्रदीप खेडकर यांनी ही प्रक्रिया तात्काळ सुरू करण्याची आणि याविषयीची अधिकृत घोषणा करण्याची पुन्हा एकदा विनंती केली आहे.

# घरबसल्या खरेदी, बाजारपेठेतील गर्दी ओसरली




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

सध्या ऑनलाइन वस्तू मागवणे अगदी सोपे झाले आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी बाजारपेठेतील स्थानिक व्यवसायावर ज्याचा मोठा विपरीत परिणाम दिसून येत आहे. ऑनलाइन खरेदीमुळे बाजारपेठेतील व्यवसाय ठप्प झाले आहेत. ऑनलाइन वस्तू खरेदी करताना फसवणुकीचे आणि प्रकार उघडकीस येत आहेत. गृहपयोगी वस्तू, किराणा हे एका मेसेजवर ऑनलाइन उपलब्ध होत आहे. परिणामी स्थानिक व्यापाऱ्यांच्या वस्तूला मागणी कमी असल्याने व्यावसायिकावर उपासमारीची वेळ आली आहे.

अमरावतीच्या बाजारपेठेत दुकाने थाटून बसलेल्या दुकानात गर्दी दिसत नाही. सध्याच्या आधुनिकतेच्या युगामध्ये जीवन गतिमान झाल्यामुळे अनेकांना कामधंद्यामुळे खरेदीसाठी वेळ मिळत नाही. त्यामुळे ऑनलाइन खरेदीकडे नागरिकांचा कल वाढताना दिसून येत आहे. मात्र, ऑनलाइन खरेदी करत असताना अनेकांना फसवणुकीला सामोरे जावे लागत आहे. घरोघरी फिरणारे लहान व्यापारी, कपड्यांपासून बटाटा, लसुण भाजीपाला, कांदे हे आपल्या टेम्पो घेऊन सर्वत्र फिरून विक्री करताना आढळून येतात. त्यामुळे बाजारपेठेतील स्थानिक व्यापाऱ्यांची कुचंबना होत असते. हे चक्र थांबण्यासारखे नाही. सध्या स्थितीत चायनीज व्यावसायला मोठी उभारी मिळत नसल्याचेही दिसून येत आहे. आधुनिक युगात मोठा बदल होऊन खरेदी विक्री सोपी झाली आहे. आता घरबसल्या पाहिजे ती वस्तू ऑनलाइन सहज उपलब्ध होत आहे. या ऑनलाइन माध्यमांमुळे स्थानिक बाजारातील प्रत्यक्ष खरेदी विक्री सण उत्सवाच्या काळातही कमी झालेली दिसून येते. मोबाइलच्या माध्यमातून इंटरनेटद्वारे ग्राहकांना ऑनलाइन खरेदी सहजरित्या करता येत आहे. विविध कंपन्या ऑनलाइन बाजारात उतरल्याने स्पर्धा निर्माण झाले आहे. त्यामुळे स्थानिक बाजारपेठेवर आर्थिक संकट ओढू लागले आहे. ग्राहकांना ऑफर सूट तसेच बाजारपेठेपेक्षा स्वस्त दरात ऑनलाइन साहित्य मिळत आहे.

# राजकमल रेल्वे पुलासाठी बजेटमध्ये मिळणार १२५.३७ कोटी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**



मागील साडेचार महिन्यांपासून शहरातील राजकमल रेल्वे उड्डाणपूल सर्वच प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. त्यामुळे शहरात वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. दरम्यान शासनाने तातडीने हस्तक्षेप करून रेल्वे उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी १२५.३७कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याची लक्षवेधी सूचना आमदार सुलभा खोडके यांनी नागपूर अधिवेशनात मांडली. दरम्यान हीच लक्षवेधी सुचना आमदार संजय खोडके यांनी विधान परिषदेमध्ये मांडली.

या महत्वाच्या विषयावर विधान परिषदेमध्ये मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी सांगितले कि, आगामी मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये बजेटमध्ये शहरातील रेल्वे उड्डाणपुलाच्या निर्मितीसाठी १२५.३७ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करणार असल्याचे सांगितले. याचवेळी पुलाच्या तात्पुरत्या सुधारणेसाठी २ कोटींचा आराखडा मंजूर करणार असल्याचे सुद्धा त्यांनी मान्य केले.२४ ऑगस्ट २०२५ पासून रेल्वे पुलावरून सर्वच प्रकारची वाहतूक बंद करण्यात आली. त्यामुळे शहरात वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण झाली आहे. नवीन रेल्वे उड्डाणपूल बांधण्याची आवश्यकता असून यासाठी निधी अपेक्षित असल्याचे आमदार सुलभा खोडके यांनी सांगितले. या कामामुळे नागरिकांना फायदा होणार आहे.

रेल्वे उड्डाणपूल निर्मितीच्या प्रकल्पाकरिता साधारणतः दोन वर्षांचा कालावधी लागणार असून काम पूर्ण होईपर्यंत शहरातील वाहतूक प्रचंड विस्कळीत होईल. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात केवळ हलक्या वाहनांच्या वाहतुकीसाठी रेल्वे पूल सुरु करून शहर वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने तात्पुरती उपाययोजना करण्याची सुचना देखील आमदार खोडके यांनी केली.

**हलक्या वाहनांसाठी रेल्वे पुल सुरु करण्याचा पर्याय**

अमरावती रेल्वे उड्डाणपुलावरून तात्पुरत्या स्वरूपात हलक्या वाहनांचे अवागमन सुरु करावे. तत्पूर्वी पुलाच्या तात्पुरत्या दुरुस्तीसाठी २ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर करण्याची सूचना सुद्धा आ. सुलभा खोडके यांनी केली आहे.

# धारणीच्या ‘नर्मदेश्वर महादेव’ मंदिरावर ’शिवभक्तांची’ मांदियाळी

## तृतीय स्थापना दिनानिमित्त शिवशक्ती हिंदू महिला धर्मरक्षक दल तर्फे जलाभिषेक, महाआरती व महाप्रसाद सोहळा संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

श्रद्धा, संस्कारआणि भक्ति वंदनेचा अप्रतिम असा सुरेख संगम घडवत, शिवशक्ती हिंदू महिला धर्मरक्षक दलाच्या तृतीय स्थापना दिनानिमित्त प्रभाग ८ येथील नर्मदेश्वर महादेव मंदिरात भव्य धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पहाटेपासूनच ’हर हर महादेव’च्या जयघोषाने परिसर दुमदुमला होता.

दरवर्षीप्रमाणेच याही वर्षी शिवशक्ती हिंदू महिला धर्मरक्षक दल तर्फे प्रभाग प्रमुखांसह महिला सदस्यांनी नर्मदेश्वर महादेवाचे जलाभिषेक, दुग्धाभिषेक आणि बिल्वार्पण मोठ्या भक्तिभावाने केले. त्यावेळी मंदिर परिसरात अखख वातावरण अगदी पवित्रतेने भारलेले होते. त्यानंतर झालेल्या महाआरतीने सर्वत्र भक्तिरस दरवळला. दिव्य प्रकाशात उजळलेले नर्मदेश्वर महादेव मंदिर भक्तांसाठी अलौकिक अनुभव ठाला.कार्यक्रमानंतर भाविकांसाठी प्रेमपूर्वक महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. महिला स्वयंसेविकांच्या नियोजनबद्ध व्यवस्थेमुळे मोठी गर्दी असूनही प्रसादवितरण सुरळीत पार पडले. भाविकांनी आयोजन कौतुकास्पद असल्याचे सांगत दलाच्या धार्मिक व सामाजिक कार्याचे कौतुकही केले.सनद असो शिवशक्ती हिंदू महिला धर्मरक्षक दल हे धारणी शहरातील कमकुवत, मध्यमवर्गीय समाजातील महिलांच्या पाठीशी खंबीर नेतृत्व उभे करण्यासोबतच महिला सशक्तीकरण, किशोरवयीन मुलींची सुरक्षितता, हिंदुत्व जागरण आणि संस्कृती संवर्धनासाठी अविरत कार्य करत असल्याने त्यांचे हे आयोजन विशेष महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे नेहमीच समाजाभिमुख उपक्रमांमध्ये इतर अनेक महिला सदस्यांनी या कार्यात सहभागी होण्याचा अभिमान व्यक्त केला आहे.स्थापना दिनाचा औचित्य साधत दलाच्या पदाधिकाऱ्यांनी महिलांच्या सुरक्षिततेसाठी, धर्मसंस्कृतीच्या जतनासाठी आणि भाविकांच्या सेवेसाठी दल सतत कार्यरत राहील, असा संकल्प व्यक्त केला. नर्मदेश्वर महादेव मंदिरात पार पडलेला हा भव्य भक्तिरस सोहळा प्रभाग ८ मध्ये श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक एकतेचादीप पुन्हा उजळून गेला, असे समाधान यावेळी उपस्थित तथा महाप्रसादाचा आस्वाद घेणाऱ्या भाविकांनी व्यक्त केले. तृतीय स्थापनदिन निमित्त आयोजित महाप्रसादासाठी दानदाते सुनिल चौथमल, कमलसिंह बैस, सुषमा गुप्ता, संगीता गुप्ता तसेच इतर सेवार्थीनी सेवार्थीभाव जपून मदतीचा हात दिला. शिवभक्तीचा जल्लोष, भक्तिरसाचा उत्सव आणि महान उदारवादी हिंदू संस्कृतीचा ठसा उमटवत नर्मदेश्वर महादेव मंदिरात तृतीय स्थापनदिन निमित्त जलाभिषेक महाआरती तथा महाप्रसाद सोहळा यशस्वी व्हावा यासाठी शिवशक्ती हिंदु महिला धर्मरक्षक दल प्रभाग क्रमांक आठ प्रमुख अध्यक्ष कोमल धनेवार, उपाध्यक्ष अंजली गुप्ता, सचिव लक्ष्मी मालवीय, कोषाध्यक्ष मेघा पांढरेकर, चंदा फकडे, प्यारीबाई जांभेकर, सकुनबाई पांढरेकर, आरती थुल, रुखमीबाई खेडकर, रामेश्वर दहीकर, दुर्गेश सेमलकर, संदीप साटोटे, नितीन साटोटे, विनोद गुप्ता तथा इतर सर्व सदस्य महिलांनी अथक परिश्रम घेतले.

# शेतात ट्रॅक्टर चालविणे मुलाच्या जिवावर बेतले; वाई बु. येथील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५वरूड**

ट्रॅक्टर चालविण्याचा प्रयत्न करीत असताना, अचानक तोल जाऊन ट्रॅक्टरखाली पडलेल्या १८ वर्षांच्या किशोरवयीन मुलाचा अपघाती मृत्यू झाला. ही घटना शेंदूरजनाघाट पोलीस ठाण्यांतर्गत असलेल्या वाई बु. येथे रविवार, १४ डिसेंबर रोजी घडली.



ओम मंगेश वानखडे (१८) रा. वाई बुद्रुक असे मृतकाचे नाव आहे. वाई बु. येथे रविवारी सकाळच्या सुमारास ओमचे मोठे वडील नरेंद्र वानखडे यांनी शेतात मशागतीकरिता एमएच २७डीई १८०६ क्रमांकाचा ट्रॅक्टर आणला होता. तो ट्रॅक्टर शेतातच उभा करूनते पाणी पिण्याकरिता गेले असता, ओमने ट्रॅक्टर चालविण्याचा प्रयत्न केला. थोड्या अंतरावर जाताच तोल गेल्याने तो खाली पडला व ट्रॅक्टरचे पुढील चाक त्याच्या अंगावरून गेले. यात ओम गंभीर जखमी झाला. जखमी अवस्थेत त्याला स्थानिक ग्रामीण रुग्णालयात नेले असता, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.याप्रकरणी शेंदूरजनाघाट पोलिसांनी नोंद घेतली असून, ठाणेदार दीपक महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली उमेश बुटले, संदीप वानखडे तपास करीत आहे. दरम्यान, ओम हा त्यांच्या कुटुंबात एकुलता एक मुलगा असल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

स्वैच्छिक रक्तदान

# गाडगेबाबा पुण्यतिथी महोत्सव व NIMAच्या सात दिवसीय आरोग्य शिबिराचा शुभारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १५ अमरावती**

वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त गाडगेनगर येथील गाडगेबाबा समाधीस्थळी रविवार, दि. १४ डिसेंबरपासून भक्तिमय वातावरणात पुण्यतिथी महोत्सवाचा शुभारंभ झाला. याच प्रसंगी नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन यांच्या वतीने आयोजित सात दिवसीय भव्य आरोग्य शिबिराचे उद्घाटन सेवा व श्रद्धेच्या भावनेतून करण्यात आले.

स्वच्छता, सेवा, सत्य आणि सद्भावनेचा संदेश देणारे महान संत गाडगेबाबा यांना यावेळी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या समाजसेवी विचारांपासून प्रेरणा घेत सर्वसामान्य नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा संकल्प उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

या सात दिवसीय आरोग्य शिबिरामध्ये नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी, विविध आजारांवरील सल्ला तसेच आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येत आहे. अधिकाधिक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास छखच-चे अध्यक्ष डॉ. प्रविण औगड, सचिव पंकज कावरे, कोषाध्यक्ष डॉ. प्रफुल्ल वराडे यांच्यासह डॉ. राजेंद्र भामकर, डॉ. अमोल ठवली, डॉ. उन्मेश डालके, डॉ. प्रफुल्ल वाकोडे, डॉ. दीपक करवा तसेच प्रा. डॉ. नरेंद्रचंद्र काठोळे उपस्थित होते. या उपक्रमाचे प्रकल्प संचालक डॉ. राजकुमार लंगडे यांनी कार्यक्रमाचे मार्गदर्शन केले.

# आदर्श गुरुदेव सेवा भजन मंडळ प्रथम; राज्यस्तरीय खंजिरी भजन स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५जरूड**



संत गाडगेबाबा पुण्यतिथी महोत्सवानिमित्त राज्यस्तरीय खंजिरी स्पर्धा १२ डिसेंबर रोजी उत्साहात पार पडली. या स्पर्धेमध्ये आदर्श गुरुदेव सेवा भजन मंडळ, निमगव्हाणने प्रथम क्रमांक पटकाविला.

द्वितीय क्रमांक हस्तपूरच्या सार्थक भजनी मंडळ तर तृतीय क्रमांक नवयुवक भजनी मंडळ, आलोडाने प्राप्त केला. चौथे बक्षीस विनोबा भावे भजनी मंडळ, सावंगी मेघे, पाचवे आदर्श ग्राम भजनी मंडळ, शेंदोळा खुर्द, सहावे जय माऊली भजनी मंडळ, लोणी, सातवे गुरुकृपा भजनी मंडळ,आलोडा, आठवे संत लटारे महाराज भजनी मंडळ, कारंजा घाडगे, नववे तुकडोजी महाराज जन्मस्थान भजन मंडळ, यावली शहीद, दहावे बक्षीस संत लखाजी महाराज भजन मंडळ, नायगाव तर अकरावे बक्षीस गुरुकृपा भजनी मंडळ, थडीपवनी यांना मिळाले. याशिवाय उत्कृष्ट गायक म्हणून लालचंद डांगे, उत्कृष्ट तबलावादक म्हणून प्रवीण फुलंबरकार, उत्कृष्ट हार्मोनियमवादक गौरव सोनटक्के, उत्कृष्ट खंजिरीवादक म्हणून सागर बांबल, उत्कृष्ट गौळण गायक वळवट बकाल येथील भजन मंडळाला गौरविण्यात आले. परीक्षक म्हणून डॉ. प्रमोद बैस, डॉ. देवेंद्र यादव, संजय ठोसर यांनी काम पाहिले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुशीलकुमार पाटील, रोशन दारोकर, रामचंद शेंबेकर, देवेंद्र पाटील, जितेंद्र पाटील, रामराव वानखडे, अशोक होले, विष्णू सालपे, श्रीराम राऊत, कैलाश माळोदे, शरद पाटील, विलास पिंपळकर, हरीश वाडेकर, अशोकराव दारोकर, रवींद्र सुरजुसे यांनी परिश्रम घेतले.

# महावितरणची दबंग कारवाई; ३१ अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

वीजबिल वसूलीत निष्काळजीपणा केल्याप्रकरणी महावितरणने अमरावती परिमंडळात कडक कारवाई केली आहे. नोव्हेंबर महिन्याची वीजबिल डिमांड वसूल करण्यात अपयशी ठरलेल्या ५ अधिकाऱ्यांच्या पगारातून एक तृतियांश रक्कम कपात करण्यात आली असून, २६ क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. वीजबिल वसूलीसंदर्भात कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिला आहे.

महावितरणचे अस्तित्व शंभर टक्के वीजबिल वसूलीवर अवलंबून आहे. अपेक्षित वसूली न झाल्याने ऑक्टोबर २०२५ अखेर अमरावती परिमंडळातील विविध वर्गवारीतील वीज ग्राहकांकडे एकूण ९०६ कोटी रुपयांची थकबाकी होती. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील ३६९ कोटी ७९ लाख आणि यवतमाळ जिल्ह्यातील ५३६ कोटी ५२ लाख रुपयांचा समावेश आहे. नोव्हेंबर महिन्यात अमरावतीत ८९ कोटी ७६ लाख तर यवतमाळ जिल्ह्यात ५५ कोटी ६९ लाख रुपयांची वसूली झाली असली, तरी अद्याप सुमारे ७५५ कोटी रुपयांची थकबाकी शिल्लक आहे.

थकबाकी वाढत असल्याने महावितरणने वसूलीसाठी आक्रमक धोरण स्वीकारले आहे. थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्याचे सक्त आदेश देण्यात आले असून, वसूलीत हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे मुख्य अभियंत्यांनी स्पष्ट केले. नोव्हेंबर महिन्याची डिमांड वसूल न झाल्याने अमरावती जिल्ह्यातील ४ आणि यवतमाळ जिल्ह्यातील २७ अधिकाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली आहे.

# विद्यार्थ्यांना शारीरिक अन् मानसिक शिक्षा देण्यावर बंदी; शिक्षण विभागाने जारी केली नवी नियमावली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

सई येथील एका शाळेतील सहावीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा शाळेत उशिरा आल्याबद्दल शिक्षा म्हणून १०० उठाबशा करायला लावल्यामुळे मृत्यू झाला. या घटनेमुळे पालकांमध्ये संताप पसरला. या प्रकाराची सरकारनेही गांभीर्याने दखल घेतली असून वसई येथील या शाळेची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. त्याशिवाय शालेय शिक्षण विभागाने सर्व शाळांसाठी नियमावली जारी करत विद्यार्थ्यांना शारीरिक आणि मानसिक शिक्षा देण्यास बंदी घातली आहे.

राज्य शिक्षण विभागाने जारी केलेल्या नवीन निर्देशांनुसार महाराष्ट्रातील शाळांना आता अधिक कठोर बाल सुरक्षा आराखड्याचे पालन करावे लागेल. ज्यात शारीरिक शिक्षा आणि मानसिक छळावर बंदी घातली आहे. त्याशिवाय जर अशा घटना घडल्या तर या गंभीर प्रकरणांमध्ये पोलिसांना वेळेत अहवाल देणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे निर्देश केंद्र सरकारच्या 'शालेय सुरक्षा आणि संरक्षणावरील मार्गदर्शक तत्त्वे (२०२१)' सर्व शाळांवर, मग त्या कोणत्याही मंडळाच्या किंवा व्यवस्थापनाच्या असोत, त्यांच्यासाठी हे नियम बंधनकारक आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शाळा प्रमुख, कर्मचारी आणि व्यवस्थापनावर थेट जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

शिक्षक आणि शाळेतील कर्मचाऱ्यांना विद्यार्थ्यांवर शारीरिक किंवा मानसिक शिक्षा करण्यास मनाई आहे. प्रतिबंधित कृत्यांमध्ये मारहाण करणे किंवा कानशिलात लावणे, कान किंवा केस ओढणे, विद्यार्थ्यांना उठाबशा काढायला लावणे, त्यांना जास्त वेळ उन्हात किंवा पावसात वर्गाबाहेर उभे करणे, विद्यार्थ्यांना ढकलणे, त्यांना गुडघे टेकवत जमिनीवर बसायला लावणे, शिक्षेच्या स्वरूपात अन्न किंवा पाणी जप्त करणे आणि वारंवार तोंडी अपमान करणे किंवा धमक्या देणे यांचा समावेश आहे. मुंबईतील एका शाळेचे मुख्याध्यापक संदीप पवार म्हणाले की, शिस्त ही आदर आणि संवादावर आधारित असली पाहिजे. तुम्ही तुमच्या स्वतःच्या मुलाशी घरी जसे वागता त्याच प्रकारे विद्यार्थ्यांना शिस्त लावली पाहिजे. भीतीपेक्षा स्पष्ट आणि ठाम संवाद अधिक




प्रभावी असतो असं त्यांनी म्हटलं. तर शाळांनी सकारात्मक आणि नाविन्यपूर्ण शिस्त पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. शिक्षा ही रचनात्मक असावी, जसे की विद्यार्थ्याला निबंध लिहायला सांगणे किंवा कविता तोंडपाठ करायला लावणे. शारीरिक किंवा तोंडी गैरवर्तन नसावे असं एका सरकारी शाळेतील शिक्षक तुषार म्हात्रे यांनी सूचवलं आहे.

दरम्यान, शैक्षणिक किंवा सुरक्षिततेशी संबंधित कारणांसाठी अपरिहार्य असल्याशिवाय खासगी संदेश, चॅट किंवा सोशल मीडियाद्वारे विद्यार्थ्यांशी वैयक्तिक संवाद टाळण्याचे निर्देश शाळांना देण्यात आले आहेत. पालकांच्या आणि संस्थेच्या परवानगीशिवाय विद्यार्थ्यांचे फोटो अथवा व्हिडिओ घेणे किंवा ते वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. सर्व शाळांनी सुलभ पायाभूत सुविधा आणि सोयीसुविधा सुनिश्चित केल्या पाहिजेत आणि तक्रारींवर त्वरित प्रतिसाद देणारी स्पष्ट, पारदर्शक तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित केली पाहिजे.शाळा प्रमुखांनी सुरक्षिततेशी संबंधित कोणतीही घटना तात्काळ नोंदवणे, सीसीटीव्ही फुटेज, उपस्थिती नोंदी आणि लेखी तक्रारींसारखे पुरावे जतन करणे आणि प्राथमिक चौकशी करणे आवश्यक आहे. लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण (पॉक्सो) कायदा किंवा बाल न्याय कायद्यांतर्गत येणाऱ्या गंभीर प्रकरणांमध्ये शाळांनी २४ तासांच्या आत पोलिसांत तक्रार दाखल करणे आवश्यक आहे असंही सांगण्यात आले आहे.

**ग्रामीण व आदिवासी भागात चिंता**

ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये याच्या अंमलबजावणीबद्दल चिंता कायम आहे. आदिवासीबहुल भागांमध्ये अनेक शाळा चालवणाऱ्या एका संस्थेत काम करणाऱ्या शिक्षकाने सांगितले की, पायाभूत सुविधांमधील त्रुटींमुळे आव्हाने निर्माण होऊ शकतात. धोरणे अनेकदा चांगल्या हेतूने तयार केली जातात, परंतु अंमलबजावणी कमी पडते. उदाहरणार्थ ज्या शाळांमध्ये नियमित वीज, इंटरनेट किंवा सेल्युलर कनेक्टिव्हिटी नाही अशा शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची देखभाल करणे कठीण आहे असं त्यांनी म्हटलं तर या नियमावलीत केवळ वैयक्तिक कर्मचाऱ्यांवरच नव्हे तर शाळा व्यवस्थापनावरही जबाबदारी टाकण्यात आली आहे. तक्रारी दडपणे, तक्रार नोंदवण्यात विलंब करणे, नोंदी नष्ट करणे किंवा सीसीटीव्ही फुटेजमध्ये फेरफार करणे यावर व्यवस्थापन आणि अधिकाऱ्यांविरुद्ध फौजदारी कारवाई केली जाईल असे निर्देशांमध्ये म्हटले आहे.

# अमरावती महानगरपालिकेसाठी शरद पवार गट सज्ज; प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांचा आढावा दौरा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) सज्ज झाल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. या पार्श्वभूमीवर पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी अमरावती दौरा करून निवडणूक तयारीचा आढावा घेतला. अमरावती येथील शासकीय विश्राम भवनात प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत बैठक घेण्यात आली.

या बैठकीत अमरावती महानगरपालिकेतील प्रभागनिहाय पक्षाची ताकद, संघटनात्मक बांधणी तसेच संभाव्य उमेदवारांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. महाविकास आघाडीच्या माध्यमातूनच ही निवडणूक लढवली जाईल, अशी घोषणा प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी यावेळी केली.

महानगरपालिकेतील सत्ता मिळविण्यासाठी पक्षाने आतापासूनच नियोजनबद्ध तयारी सुरू केली असून, तळागाळातील कार्यकर्त्यांना सक्रिय करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. आगामी काळात प्रभागस्तरावर बैठकांचे आयोजन करून संघटन अधिक मजबूत केले जाईल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# विदर्भातील शेतकऱ्यांना सोलरची जबरदस्ती नको

## सोलर ऐवजी ऐजीचे विद्युत कनेक्शनची सर्वाधिक मागणी; धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी माजी अर्थ तथा वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५तिवसा**

विदर्भातील शेतशिवारात वन्यप्राण्यांचा हैदोस आहे. माकडांच्या उत्पादामुळे सोलरच्या प्लेट फुटणे आणि सोलर यंत्र नादुरुस्त होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. शिवाय, सोलरवर मोटार पंप पाहिजे त्याप्रमाणे चालत नसल्याने पिकांचे ओलीत होत नाही. थोडेजरी ढगाळ वातावरण असले तरीही सोलर बंद पडते. अशा परिस्थितीत सरकारने शेतकऱ्यांसाठी सोलर सक्तीचा घेतलेला धोरणात्मक निर्णय शेतकऱ्यांसाठी मारक आहे. परिणामी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलर सक्तीचे धोरण बदलून मागेल त्याला सोलर आणि मागील त्याला ऐजीचे विद्युत कनेक्शन देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्याच्या मागणीसाठी माजी अर्थमंत्री तथा वनमंत्री सुधीर



मुनगंटीवार यांना शनिवारी हिवाळी अधिवेशनात तिवसा तालुक्यातील तीन ग्रामपंचायत सरपंच्यांनी निवेदन दिले

यावेळी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे, शिवनगाव ग्रामपंचायत सरपंच धर्मराज खडसे, अनकवाडीचे सरपंच सूरज धुमनखेडे आणि धोत्रा येथील सरपंच भूषण गाठे यांची उपस्थिती होती. यावेळी सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, ज्या जिल्ह्याने राज्याला ऊर्जा दिली. थर्मल पॉवर स्टेशन दिले त्याच जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ऐजी पंपाचे कनेक्शन द्यायला तयार नाही. माझा चंद्रपूर सर्कल सुद्धा ऐजी पंपाच्या कनेक्शन पासून वंचित आहे. त्यामुळे सोलरची सक्ती ही चुकीचीच आहे. ऐजी पंपाचे कनेक्शन द्यायलाच पाहिजे असे म्हणत. दिलेल्या निवेदनाद्वारे तातडीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून यासंदर्भातील धोरण बदलण्याची मागणी करणार असल्याचे आश्वासन यावेळी माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले.

राज्यातील विधानभवन, मंत्रालय, शासकीय कार्यालये, मंत्री कार्यालये का सोलरवर करण्यात आले नाही. घ्या मग सर्वसमावेशक निर्णय होऊ द्या , सोलर सक्ती सर्वांनाच व्हायला पाहिजे. मग इथे सोलरची सक्ती फक्त शेतकऱ्यांनाच का ? असा प्रश्न सुद्धा यावेळी सुधीर मुनगंटीवार यांनी चर्चा करतांना त्यांनी उपस्थित केला.

> तिवसा तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी सोलर पंप घेतले आहे. अनेकांचे सोलर कनेक्शन नादुरुस्त आहे. शेतकऱ्यांना मेंटनन्स करण्यासाठी आर्थिक बोजा सहन करावा लागतो आहे. शिवणगाव, अनकवाडी आणि धोत्रा, वर्हा, मार्डी या भागात सोलर कनेक्शन घेतलेल्या शेतकरी संकटात सापडले आहे. त्यामुळे सरकारने सोलर सक्तीचा धोरणात्मक निर्णय बदलवून विदर्भासह राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.
>
> **– प्रशांत कांबळे, सामाजिक कार्यकर्ते.**

# शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी प्रथमच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधीचे घेतले दर्शन





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५तिवसा**

आज दि.१५ डिसेंबर २०२५ रोजी गुरुकुंज मोझरी येथील वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या महासमाधीचे दर्शन घेऊन व मंदीर स्थळाचे दर्शन घेऊन यांचे अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दन पंत बोथे गुरुजी यांनी संपुर्ण तुकडोजी महाराजांच्या कर्मभूमी महासमाधी स्थळी माहिती दिली. त्यानंतर कैद्रीय अखिल भारतीय सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी येथील कार्यालयामध्ये त्यांचा स्वागत व पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आले.उपस्थित प्रदेश अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (श.पवार) यांचे सदिच्छा भेट दिली.मा.शशिकात शिंदे (प्रदेशाध्यक्ष ), माजी गृहमंत्री मा.अनिल देशमुख,माजी अन्न नागरी पुरवठा मंत्री नागपूर मा.रमेश बंग, तसेच तिवसा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे डॉ.सुभाषराव तवर,हेमंत बोबडे,गजानन काळे, पुरुषोत्तम दाते,अंबादास तायडे, शरद कांडलकर , धनराज बारबुद्धे, कांडलकर,मंगेश पोल्हाड, डॉ. जयस्वाल सर उपस्थित होते.


# यंदा २१ डिसेंबरला वर्षातील सर्वात लहान दिवस राहणार

## १० तास ४७ मिनीटांच्या सर्वात लहान दिवसाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

वैज्ञानिक आणि खगोलीय घटनांबद्दल सर्वसामान्यांमध्ये नेहमीच कुतूहल आणि उत्सुकता असते. पृथ्वीवर प्रकाश पसरवणारा सूर्य वर्षातील एका दिवशी अत्यंत कमी वेळ दर्शन देत असतो. या दिवशी पृथ्वीशी संबंधित अशी खगोलीय घटना घडत असते की, त्या दिवशी सूर्य लवकर मावळत असतो, त्यामुळे रात्र फार मोठी असते. यंदा २१ डिसेंबरला वर्षातील सर्वात लहान दिवस राहणार आहे.

२१ डिसेंबर रोजी सूर्य जास्तीत जास्त दक्षिणेकडे राहिल. या बिंदूला 'विंटर सोल्स्टाईस' असे म्हणतात. सोलस्टाईस शब्द सोल्सटाइन या लॅटीन शब्दापासून तयार झाला आहे. 'सूर्य स्थिर आहे' असा त्याचा अर्थ होतो. भारतात पावसाळ्यानंतर येणाऱ्या हिवाळ्यात रात्र मोठी असते आणि दिवस लहान होत जातो. या बिंदूवर सूर्य असताना दिवस हा वर्षातला सर्वात लहान दिवस व रात्र ही सर्वात मोठी असते. २१ डिसेंबरचा दिवस हा १० तास ४७ मिनिटांचा राहिल. या दिवसात दरवर्षाला एक दिवसाचा फरक पडू शकतो.




दिवस व रात्रीचा कालावधी कमीजास्त होणे आपण नेहमीच अनुभवत असतो. पृथ्वीचा अक्ष २३.५ अंशाने कललेला असल्याने हे घडत असते. व याचाच परिणाम म्हणून सूर्याचे उत्तरायन व दक्षिणायन सुध्दा आपल्याला अनुभवता येते. कोणत्याही वस्तूच्या पडणाऱ्या सावलीचे निरीक्षण केल्यास सूर्याचे दक्षिणायण व उत्तरायण सहज लक्षात येऊ शकते.

सर्व खगोल प्रेमींनी व जिज्ञासूंनी २१ डिसेंबर या सर्वात लहान दिवसाचे प्रत्यक्ष कालमापन करावे व या १० तास ४७ मिनीटांच्या सर्वात लहान दिवसाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा, असे आवाहन मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने आणि हौशी खगोल अभ्यासक विजय म. गिरुळकर यांनी केले आहे.

पृथ्वीवरील ऋतू सुध्दा पृथ्वीच्या अक्षाच्या कलत्या स्थितीमुळे निर्माण होतात. आकाशात वैषुविक आणि आयनिक वृत्ताचे दोन काल्पनिक छेदन बिंदू आहेत. यापैकी एका बिंदूत २२ मार्च रोजी सूर्य प्रवेश करतो याला 'वसंत संपात बिंदू' असे म्हणतात. तर त्याचे विरुद्ध बिंदूत २३ सप्टेंबर रोजी सूर्य प्रवेश करतो याला 'शरद संपात बिंदू' असे म्हणतात. या दोन्ही दिवशी रात्रीचा व दिवसाचा कालावधी हा सारखाच असतो. २१ डिसेंबर रोजी सूर्य जास्तीत जास्त दक्षिणेकडे असतो. या बिंदूवर सूर्य असतांना दिवस हा वर्षातला सर्वात लहान दिवस व रात्र ही सर्वात मोठी असते. या दिवसाला 'हिवाळा अयन दिवस' असे सुध्दा म्हणतात.

# पक्षाच्या विचारांशी गद्दारी; भाजपमधून चार पदाधिकाऱ्यांची हकालपट्टी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अकोला**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पक्षाच्या विचारांशी गद्दारी करण्यासह उमेदवाराला पराभूत करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या मूर्तिजापूर येथील चार पदाधिकाऱ्यांना जिल्हा भाजपने सहा वर्षांसाठी निलंबित केले आहे. उमेदवारांच्या तक्रारीनंतर भाजप जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर यांनी ही कारवाई केली. जिल्ह्यात या अगोदर देखील काही पदाधिकाऱ्यांना पक्षातून निलंबित करण्यात आले आहे.



स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. अकोला जिल्ह्यात अकोट, तेल्हारा, मूर्तिजापूर, हिवरखेड नगरपालिका व बार्शीटाकळी नगर पंचायतसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. न्यायालयीन प्रक्रियेमुळे बाळापूर येथील निवडणूक लांबणीवर गेली. आता २० डिसेंबरला त्या ठिकाणी मतदान होणार आहे. दरम्यान, उमेदवारीसाठी अनेक जण इच्छूक असल्याने मूर्तिजापूर येथे भाजपांतर्गत नाराजी होती.

त्यातून अनेकांनी पक्षविरोधी काम केल्याचा आरोप केला आहे. पक्षाच्या विचारांशी गद्दारी तसेच पक्ष उमेदवारांना पराभूत करण्याचा प्रयत्न व पक्षाच्या विरोधात प्रचार करणाऱ्या मूर्तिजापूर येथील मंडळ कार्यकारिणी उपाध्यक्ष कमलाकर गावंडे, भारतीय जनता युवा मोर्चाचे उपाध्यक्ष अमोल पिंपळे, भा.ज.यु.मो. मंडळ अध्यक्ष श्रीकांत रामेकर, नमामी गंगे अभियान प्रमुख नितीन भटकर यांना सहा वर्षांसाठी निलंबित केले आहे. पक्षविरोधी कृत्याचा पुरावा तसेच उमेदवार हर्षद साबळे यांच्या तक्रारीवरून भाजप जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर यांनी ही कारवाई केली आहे.

उमेदवार व पक्ष विरोधी काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. शिस्त, विचार, आचरण, पक्षाविषयी आपुलकी, पक्षाने दिलेले उमेदवार व पक्षाचे काम करणे हे प्रत्येक पदाधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. या कर्तव्याचा कसूर करणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यात येत असल्याचे जिल्हाध्यक्षांनी स्पष्ट केले. पक्षातून सहा वर्षांसाठी हकालपट्टी केल्याने त्यांना कोणत्याही संघटनेच्या कार्यक्रमात बोलवण्यात येऊ नये, असे निर्देश देण्यात आले आहेत.

**तेल्हारा, अकोट, बाळापूरनंतर मूर्तिजापूरमध्ये कारवाई**

भाजप पक्षाने या अगोदर तेल्हारा, अकोट, बाळापूर येथील पक्ष विरोधात कार्य करणाऱ्यांवर कारवाई केली होती. आता मूर्तिजापूर येथे विरोधात काम करणाऱ्या चार पदाधिकाऱ्यांविरोधात पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. या कारवाई संदर्भात शिफारस प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे करण्यात आली. निवडणूक काळात मिळालेल्या अधिकाराचा वापर करून पक्ष संघटनेच्या विचाराशी गद्दारी करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार असून विरोधात काम करणाऱ्या कुणालाही माफ केले जाणार नाही, असा इशारा भाजपने संबंधितांना दिला आहे.



# अंजनगाव नगरपालिका निवडणुकीचे वातावरण थंड गतीने

## उमेदवारांचा खर्च आटोक्यात कार्यकर्त्यांत नाराजीचा सूर

**सचिन पाटील अब्रुक**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या निवडणुकीचे वातावरण अपेक्षेप्रमाणे तापलेले न दिसता संथ गतीने पुढे जात आहे. नगराध्यक्ष पदासाठी सात उमेदवार रिंगणात असून, सदस्य पदासाठी तब्बल १७३ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. अमरावती जिल्ह्यात पुढे ढकलण्यात आलेली एकमेव ही नगरपरिषद निवडणूक असून, दुसऱ्या टप्प्यात २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे.

गेल्या तीन दिवसांपासून आवाजी प्रचार सुरू असला तरी मतदारांमध्ये अपेक्षित उत्साह दिसून येत नाही. उमेदवारांनी निवडणूक खर्चावर ब्रेक लावल्याने ही निवडणूक नगरपालिका की ग्रामपंचायत अशी शंका नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. उमेदवारी जाहीर होण्यापूर्वी कोट्यवधी खर्चाची भाषा करणारे अनेक उमेदवार आता पक्षाच्या मर्यादित निधीवरच प्रचार करत असल्याचे चित्र आहे.नगराध्यक्ष पदाच्या सात उमेदवारांपैकी पाच जण मतदारांना परिचित आहेत. त्यात काही आर्थिकदृष्ट्या सक्षम असतानाही कार्यकर्त्यांवर खर्च कमी केला जात असल्याची नाराजी प्रभागातील उमेदवार व्यक्त करीत आहेत. काही पक्षांनी दिलेला प्रचार निधीही योग्यरीत्या वापरला जात नसल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. परिणामी, खर्चाच्या अभावामुळे पराभवाची शक्यता वाढत असून त्याचा फटका प्रभागातील उमेदवारांनाही बसू शकतो, अशी भावना सत्ताधारी पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये दिसून येत आहे.

# उद्धव ठाकरेंचा आदेश! विधानसभाप्रमुख संतोष ढवळे यांची शिवसेनेतून हकालपट्टी; काँग्रेसला मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५यवतमाळ**

राज्यात शिवसेना (उबाठा), काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शप) हे पक्ष महाविकास आघाडीत असताना, यवतमाळ नगर परिषद निवडणुकीत स्वतंत्रपणे लढत आहेत. या दरम्यान पक्षविरोधी कारवाया करून काँग्रेसला सहकार्य केल्याचा ठपका ठेवत शिवसेना (उबाठा) यवतमाळ विधानसभा प्रमुख संतोष ढवळे यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आल्याचे जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र गायकवाड यांनी सांगितले.



राज्यात महाविकास आघाडी असली तरी यवतमाळ नगर परिषदेच्या निवडणुकीदरम्यान पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरोधात जाऊन संतोष ढवळे यांनी काही शिवसैनिकांना काँग्रेस पक्षाची उमेदवारी मिळवून दिली. या उमेदवारांसाठी ते शिवसेनेच्या विरोधात प्रचार करत असल्याने त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, विधानसभा प्रमुख म्हणून कार्यरत असतानाही संतोष ढवळे यांनी यवतमाळ नगर परिषदेच्या निवडणुकीत शिवसेना (उबाठा) पक्षाच्या नगराध्यक्ष तसेच नगरसेवक पदाच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात काँग्रेस पक्षाचा उघडपणे प्रचार केला. हे कृत्य पक्षाच्या ध्येयधोरणांच्या विरोधात आणि पक्षशिस्तीचा भंग करणारे असल्यामुळे त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात आली आहे.

संतोष ढवळे हे यवतमाळ येथील शिवसेनेतील आक्रमक चेहरा म्हणून ओळखले जात होते. ते अनेक वर्षांपासून शिवसेनेशी जोडलेले होते आणि त्यांनी पक्षाच्या माध्यमातून विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. पक्षात फूट पडली तेव्हा ते उद्धव ठाकरे यांच्याबाजूने ठामपणे उभे राहिले. हकालपट्टीपूर्वी ते शिवसेना (उबाठा) पक्षाचे यवतमाळ विधानसभा प्रमुख म्हणून कार्यरत होते. यापूर्वी त्यांनी यवतमाळ विधानसभा मतदार संपर्क प्रमुख यासारख्या जबाबदाऱ्याही पार पाडल्या. ढवळे यांनी अनेक राजकीय आणि सामाजिक विषयांवर आक्रमकपणे आवाज उठवला आहे. त्यांचे वक्तव्य आणि आंदोलन करण्याची पद्धत अनेकदा चर्चेचा विषय ठरली आहे. एका प्रकरणात भाजप नेत्यावर टीका करताना जाहीरपणे मोठे बक्षीस घोषित केले होते. त्यामुळे ते राज्यभर चर्चेत आले होते. संतोष ढवळे यांनी यापूर्वी शिवसेनेच्या तिकिटावर विधानसभा निवडणूक लढवली होती. त्यावेळी अत्यल्प मतांनी त्यांचा पराभव झाला. तसेच एकदा बंडखोरी करून अपक्ष म्हणूनही निवडणूक लढविली होती.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत